| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३०६ वा | सोमवार, दिनांक ०२ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## ज्ञानसाधनेचा महामेरु विसावला- डॉ.जनार्दन वाघमारे

महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक ,समीक्षक,प्राचार्य व देशभरात गाजणाऱ्या लातूर पॅटर्नचे निर्माते, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरु, लातूर नगरीचे एकमेव लोक निर्वाचित नगराध्यक्ष,माजी खासदार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे आजीव सदस्य तथा लातूर जिल्हा शाखेचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ.जनार्दनजी वाघमारे यांचे आज सोमवार दि.२ मार्च २०२६ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद् निधन झाले.त्यांच्या जाण्याने मराठी सारस्वतातील एक लख्ख प्रकाश आज विझला आहे.त्यानिमित्ताने त्यांचा जीवनप्रवास थोडक्यात शब्दातीत करण्याचा हा अल्पसा प्रयत्न...

विद्येमुळे जीवनास कृतार्थता आणि व्यक्तीस श्रेष्ठता लाभते असे म्हटले जाते. या प्रमेयाचे प्रत्यक्ष आणि मूर्तिमंत उदाहरण म्हणून डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या जीवनाकडे पाहता येईल. अखंड वाचन, चिंतन, अध्ययन, अध्यापन, ग्रंथलेखन, परिशालन, तत्त्वचिंतन आणि विचारमंथन या प्रक्रियांनी संपन्न असे डॉ. वाघमारे यांचे जीवन हे एक नवलच होते.

११ नोव्हेंबर १९३४ रोजी लातूर जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील 'कवठा' या छोट्याशा गावी जनार्दन वाघमारे यांचा जन्म झाला. त्यांचे वडील माधवराव वाघमारे यांची लातूरला आडत होती. त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी गावातच एक शिक्षकांना पाचरण केले होते. पुढे लातूर येथील सरकारी शाळेत त्यांनी प्रवेश घेतला. भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर हे त्यांच्याबरोबरच शिकायला होते. दोघांची तेव्हापासूनची मैत्री होती. पुढे ते मारवाडी राजस्थान विद्यालयातून ते मॅट्रीक उत्तीर्ण झाले. तेव्हा शिक्षणाचे माध्यम हे उर्दू होते. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण हैदराबाद येथे झाले. ते अभ्यासात नेहमी अव्वल असायचे. निजाम कॉलेजला असतानाच इ.स. १९५५ साली 'अखिल भारतीय हिंदी वक्तृत्त्व स्पर्धेत' जनार्दन वाघमारे यांनी प्रथम पारितोषिक पटकाविले. त्याबद्दल त्यांचे भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ .राजेंद्रप्रसाद, तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांनी प्रत्यक्ष भेटीत त्यांचे कौतुक केले. एवढ्या कमी वयात अशा महान विभूतींची मिळालेली कौतुकाची थाप ही जनार्दन वाघमारे यांच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली.इ.स. १९५७ साली बी.ए. ची पदवी (निजाम कॉलेज) उस्मानिया विद्यापीठातून त्यांनी घेतली.

एम.ए.ला इंग्रजी भाषा आणि साहित्य हे विषय घेऊन इ.स. १९५९ साली त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथून पूर्ण केले. त्याच दरम्यान उमरगा येथे शिवछत्रपती महाविद्यालयात देवीसिंह गुरुजींच्या आग्रहास्तव ते रुजु झाले. दोन वर्षांनी लगेच १९६२ साली ते औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात रुजु झाले. त्याचवेळी ते मराठवाडा विद्यापीठात एल.एल.बी. करु लागले.

बालपणापासूनच आर्यसमाजी संस्कार असलेल्या जनार्दन वाघमारे यांनी दरम्यानच्या काळात कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील 'हळ्ळीखेड' येथील माणिकराव आर्य (जाधव) यांच्या 'सुलोचना' नावाच्या मुलीशी २२ मे १९६२ रोजी आंतरजातीय विवाह केला. त्यांना सुचेता, जितेंद्र व अस्मिता ( दोन मुली आणि एक मुलगा) अशी तीन अपत्ये झाली.

प्रा.वाघमारे यांनी सहा वर्षे औरंगाबादच्या देवगिरी महाविद्यालय इंग्रजी विषयाचे अध्यापन केले. दरम्यानच्या काळात १९७० साली लातूर येथे काही बहुजन समाजातील मंडळींनी एकत्रित येऊन 'राजर्षी शाहू महाविद्यालयाची' स्थापना केली. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या आग्रहास्तव येथे 'पहिले प्राचार्य' म्हणून ते रुजू झाले.

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मोलाची साथ दिली. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभासाठी तत्कालीन उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण व मुख्यमंत्री शरद पवार यांना प्राचार्य वाघमारे यांनी बोलाविले होते. यशवंतरावांच्या मृत्युनंतर त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्यासाठी प्राचार्य वाघमारे यांनी यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठानची स्थापना लातूर येथे केली होती. नगराध्यक्ष असताना त्यांनी लातूर नगर पालिकेच्या आवारात यशवंतराव चव्हाणांचा पूर्णाकृती पुतळाही बसविला.शिवाय गत चार दशकांपासून ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई चे आजीव सदस्य व लातूर केंद्राचे अध्यक्ष होते. यामुळेच यशवंतरावांचे राजकीय वारसदार तथा मानसपूत्र शरद पवार यांचे ते गेल्या चार दशकांपासून निकटवर्ती आहेत.

राजर्षी शाहु महाविद्यालयात अनेक शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाचे प्रयोग प्राचार्य वाघमारे यांनी राबविले.विषमता निर्मुलनाची परिषदही त्यांनी येथेच यशस्वी केली. शिक्षण क्षेत्रातील 'लातूर पॅटर्न' यांच्याच काळात आकाराला आला.

राजर्षी शाहु महाविद्यालय महाराष्ट्राच्या किंबहुना देशाच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राचे केंद्र म्हणून नावारुपाला येण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले आहेत. तब्बल २५ वर्षांच्या (१९७० ते १९९४) प्राचार्य पदाच्या कारकीर्दीत डॉ. वाघमारे यांनी घडविलेले हजारो विद्यार्थी देश-विदेशात चांगल्या हुद्यावर आहेत.

डॉ. वाघमारे यांचे साहित्य क्षेत्रातही उच्च कोटीचे स्थान आहे. १९७८ साली प्रकाशित



झालेल्या डॉ. वाघमारे यांच्या 'अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती' या पहिल्याच पुस्तकाचे महाराष्ट्रातील बुद्धिवंतांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. विशेष म्हणजे हे पुस्तक वाचून पु.ल.देशपांडे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये एक प्रदीर्घ लेख लिहिला होता. यावरून त्यांच्या लेखनशक्तीचा अंदाज येतो. त्यानंतर 'महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण (१९८०)', 'साहित्य चिंतन (१९९२)', 'चिंतन एका कुलगुरुंचे (१९९९)' 'चिंतन एका नगराध्यक्षाचे (२००६)', 'मुठभर माती (आत्मकथा) (२००६)', 'शरद पवार : व्यक्तित्व, नेतृत्व आणि कर्तृत्व' असे एकूण आजवर चार इंग्रजी, तीन हिंदीसह तब्बल ७६ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत व आणखी तीन ते चार ग्रंथ प्रकाशनाच्या उंबरठ्यावर आहेत. यातील जवळ-जवळ प्रत्येक पुस्तकाला विविध संस्थांकडून पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.भारतातील दलित चळवळींनी ते संलग्न हेते ते त्यांच्या लेखनातून व प्रत्यक्ष व्यवहारातून लक्षात येते. आयुष्याच्या एका वळणावर एका हृदयस्पर्शी भावनेने ओतप्रोत अशा हिंदी कविताही त्यांनी लिहिल्या आहेत म्हणून ते कवीही आहेत.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ते १९९४ साली स्थापन झालेल्या नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू झाले.५ वर्षांच्या आपल्या कुलगुरुपदाच्या कारकीर्दीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.कुलगुरु असतानाच चलबुर्गा (ता. औसा) 'राष्ट्रीय सेवाग्रामची' उभारणी केली. या माध्यमातून 'जाती-पाती विरहीत गाव' त्यांनी उभे केले. सरांच्या साहित्यावर सहा विद्यार्थ्यांनी पीएच् .डी. तर दोन विद्यार्थ्यांनी एम.फिल् .केली आहे.

कुलगुरु पदावरून डॉ.वाघमारे १९९९ साली निवृत्त झाले. त्यानंतर लगेच दोन वर्षांनी २००१ साली ते लातूर नगर पालिकेचे नगराध्यक्ष म्हणून थेट जनतेतून मोठ्या मताधिक्क्याने निवडून आले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी नगरपालिकेत भ्रष्टाचार मुक्त धोरणाची अंमलबजावणी केली. त्यासाठी त्यांना खूप कष्ट सोसावे लागले. अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत असतानाच महाराष्ट्र राज्य संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाद्वारे दिले जाणारे २००६ चे पहिले पारितोषिक लातूर नगरपालिकेने डॉ. जनार्दन वाघमारे यांच्याच काळात पटकाविले.

डॉ.वाघमारे यांच्या कार्याची विशेष दखल घेत शरद पवार यांनी (एप्रिल २००८ ते एप्रिल २०१४) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे त्यांची थेट राज्यसभेचे सदस्य म्हणून निवड केली. याशिवाय मानव संसाधन विकास समिती, संसद सदस्य, स्थानिक विकास निधी समिती, संरक्षण मंत्रालयाची सल्लागार समिती व विविध महत्त्वपूर्ण पदांच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर देऊन त्यांच्या बुद्धिचा गौरवच केला असे म्हणावे लागेल. दिल्ली येथे सुरुवातीचे साधारणतः १० महीने त्यांना रहायला शासकीय निवासस्थानही मिळाले नाही, त्यामुळे ते महाराष्ट्र सदन मध्येच रहायचे. २००९ साली आंतरराष्ट्रीय सभेसठी (ण.छ. .) भारतीय लोकप्रतिनिधीचे जे प्रतिनिधी मंडळ गेले, त्यात डॉ. वाघमारे यांचा समावेश होता. तेथे जगातील १५० राष्ट्रांच्या लोकप्रतिनिधींसमोर शांततेच्या प्रश्नावर आपली मते मांडून सभागृह जिंकण्याची किमया या लातूरच्या भुमीपूत्राने केली हे विशेष ! डॉ. वाघमारे यांनी संसदेत विवाहपूर्व एड्स (एच.आय.व्ही.) तपासणी होण्यासंदर्भाचे महत्वपूर्ण बिल सादर केलं.

डॉ.जनार्दन वाघमारे यांना अत्यंत महत्त्वपूर्ण अशा शासकीय व अशासकीय अनेक पुरस्काराने वेळोवेळी सन्मानित करण्यात आले आहे. शिवाय त्यांच्या साहित्यकृतींनाही सुमारे १५ हून अधिक पारितोषिके मिळालेली आहेत. १९७९ साली संपन्न झालेल्या पाचव्या अस्मितादर्श दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापासून जते डिसेंबर २०१६ मध्ये सोयगाव, जि.औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या ३८ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अशा आजवर सुमारे १२ मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद व विशेष म्हणजे ऑक्टोबर २०१७ मध्ये लातूर येथे संत कबीर प्रतिष्ठान द्वारा आयोजित 'आंतरराष्ट्रीय हिंदी भाषा ( संगोष्ठी )साहित्य संमेलनाचेही अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे हे विशेष! त्यांना १९९४ साली महाराष्ट्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने सन्मानित केले होते.

अशा लातूर पॅटर्नचे जनक असलेल्या अलोक कीर्तीच्या विचारसुर्याचा आज अस्त झाला. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण विनम्र अभिवादन!

---------------

**डॉ.विवेक सौताडेकर**
**खजिनदार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई जिल्हा केंद्र, लातूर**
**मो.९४०३१०१७५१**

# डॉ. जे. एम. वाघमारे यांचे निधन

## लातूर पॅटर्नचे शिल्पकार काळाच्या पडद्याआड



**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ विचारवंत माजी खासदार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू, लातूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांचे लातूर येथे सोमवारी शनिवारी त्यांच्या निवासस्थानी सकाळी निधन झाले.

गेली काही दिवसापासून ते आजारी होते राज्यभर प्रसिद्ध असलेल्या लातूरच्या शाहू महाविद्यालयाच्या उभारणीत डॉ. वाघमारे यांचा मोलाचा वाटा होता , ते या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. सर्वदूर प्रसिद्ध शैक्षणिक लातूर पॅटर्नची निर्मिती त्यांनी याच महाविद्यालयात केली. १९९४ ते १९९९ या कालावधीत ते स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू होते डिसेंबर २००१ मध्ये ते लातूरचे नगराध्यक्ष झाले.

लातूर, बीड ,परभणी, उस्मानाबाद जिल्हा नियोजन समितीवर ते विशेष निमंत्रित होते. महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे सदस्य . साहित्य संस्कृती मंडळ सदस्य , गॅझेटीयर संपादक मंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. २८ पेक्षा अधिक पुस्तके त्यांनी लिहिली. मूठभर माती हे त्यांचे आत्मचरित्र आहे.

अमेरिका, इंग्लंड,श्रीलंका, कॅनडा आदी देशात त्यांनी शैक्षणिक दौरे केले. समाजसेवेत त्यांची वेगळी ओळख होती. भूकंपग्रस्त चलबुर्गा हे जातीपाती विरहित गाव त्यांनी उभारले होते.त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. संयुक्त राष्ट्र संघ यु एन जनरल असेंबलीच्या ६४ व्या अधिवेशनात भारताच्या प्रतिनिधी मंडळात सदस्य म्हणून त्यांचा समावेश होता.

त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. शिक्षणाचा विस्तार तळागाळापर्यंत व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. काही दिवसापूर्वी ते त्यांच्या घरात पडले होते त्यांच्या डोक्याला मार लागला होता. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते.

### लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वाची अपरिमित हानी : पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले

ज्येष्ठ विचारवंत, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, प्रगल्भ शिक्षणतज्ज्ञ तसेच राज्यसभेचे माजी खासदार आदरणीय डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अत्यंत दुःख झाले आहे. त्यांच्या निधनाने शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक बहुआयामी व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने लातूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वाची अपरिमित हानी झाली आहे.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. वाघमारे हे खऱ्या अर्थाने ज्ञान, विचार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी समाजप्रबोधन, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि प्रगतिशील विचारांची मांडणी सातत्याने केली. लातूर जिल्ह्यातील कवठा सारख्या छोट्या गावातून सुरू झालेला त्यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास राज्यसभेपर्यंत तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठापर्यंत पोहोचला. आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर त्यांनी लातूर जिल्ह्याचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव वाढविला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू म्हणून त्यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय पायाभरणीत मोलाचे योगदान दिले. तसेच लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्य करताना त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोन आणि सामाजिक जाणीव असलेली पिढी घडविण्याचे कार्य केले. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील.

साहित्य क्षेत्रातही त्यांनी विपुल लेखन करून वैचारिक समृद्धी वाढविली. विविध साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी साहित्य चळवळीला नवी दिशा व विचार दिले. अभ्यासू लेखक, प्रभावी वक्ते आणि संवेदनशील चिंतक म्हणून त्यांची ओळख राज्यभर निर्माण झाली होती.

लातूर शहराचे थेट जनतेतून निवडून आलेले लोकनिर्वाचित पहिले नगराध्यक्ष म्हणून त्यांनी शहराच्या विकासासाठी दूरदृष्टीने कार्य केले. प्रशासनातील पारदर्शकता, लोकसहभाग आणि विकासाभिमुख धोरणांमुळे त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसमोर आदर्श निर्माण केला. सार्वजनिक जीवनात तत्त्वनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि समाजहिताची भूमिका त्यांनी अखेरपर्यंत जपली.

त्यांच्या निधनाने एक तत्त्वनिष्ठ मार्गदर्शक, अभ्यासू नेतृत्व आणि समाजाला दिशा देणारा विचारवंत आपण गमावला आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. दिवंगत डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या परिवारास या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

### शिक्षण, राजकारण, समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक दुवा निखळला - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/ प्रतिनिधी :** विद्वत्ता, तत्वनिष्ठ आणि, लोकाभिमुखता यांचा त्रिवेणी संगम असलेल्या माजी खासदार प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक असा दुवा निखळला आहे, अशी भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, प्रा. डॉ. वाघमारे यांचा इंग्रजी भाषा आणि साहित्यासह अर्थशास्त्र, राज्यशास्त्राचा गाढा अभ्यास होता. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अध्यापन आणि प्रशासन या अंगाने मोठा ठसा उमटवला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी प्रभावी कार्य केले. विशेष म्हणजे त्यांनी लातूरचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्षपदही भुषविले. या काळात त्यांनी शहराच्या विकासासाठी लातूर व्हिजन म्हणून आराखडा तयार केला. शहरातील स्वच्छता, पाणी पुरवठा तसेच नागरी सुविधांसाठी प्रयत्न केले. त्यामुळे लातूरला तत्कालीन संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानात प्रथम पुरस्कार देखील मिळाला होता. राज्यसभा सदस्य म्हणूनही त्यांनी विविध संसदीय समितीवर काम केले. लातूरचे किल्लारी भूकंपशास्त्र संशोधन आणि नांदेड - किनवटच्या आदिवासी संशोधन आणि अभ्यास केंद्रांच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. त्यांना संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिवेशनात भारताचे प्रतिनिधी मंडळाचा सदस्य म्हणून म्हणणे मांडण्याची संधी मिळाली होती. त्यांनी वैविध्यपूर्ण विषयांवर विपुल साहित्य निर्मिती केली. त्यांची ही ग्रंथसंपदा आपल्या सर्वांसाठी एक प्रकारचे संचित आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ वाघमारे यांच्या निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक असा दुवा निखळला आहे. ही सामाजिक क्षेत्राची हानी आहे. आम्ही वाघमारे कुटूंबियाच्या दुःखात सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, माजी कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### लातूर पॅटर्नचा जनक हरपला...

माजी खासदार, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ, लातूर पॅटर्नचे जनक डॉ. जनार्दन वाघमारे सरांचे दुःखद निधन झाले. काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते, आज त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या जाण्याने सामाजिक, राजकीय व साहित्य क्षेत्रातील एक नामवंत अभ्यासू व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेलं. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, ही प्रार्थना.

**- सहकार मंत्री बाबासाहेब पाटील**

### शाहू पॅटर्न चे जनक हरवले

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व राज्यात शाहू पॅटर्न निर्माण करणारे राज्यसभा चे माजी खासदार डॉ जनार्दन वाघमारे यांच्या दुःखद निधनाने एक शैक्षणिक, सामाजिक चळवळ, साहित्यिक क्षेत्राबरोबरच राजर्षी शाहू पॅटर्न चे जनक आज हरवले आहेत अशी भावना राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी बोलताना व्यक्त केली.

डॉ जनार्दन वाघमारे सर यांनी आपल्या कार्यकाळात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथे माजी कुलगुरू, तसेच लातूर शहरचे थेट नगराध्यक्ष म्हणून कार्य केले हे करीत असताना समाज जीवनात मोलाची भूमिका बजावली. शिक्षण, समाजप्रबोधन आणि सार्वजनिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या कार्यातून अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली. विचारांची समृद्ध परंपरा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी हीच त्यांची खरी ओळख होती. देशमुख परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

भावपूर्ण श्रद्धांजली.

**-दिलीपराव देशमुख.**
**माजी मंत्री सहकार महर्षी लातूर.**

### सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली

माजी खासदार, माजी नगराध्यक्ष, माजी कुलगुरू व शिक्षणतज्ज्ञ आदरणीय डॉ. जे. एम. वाघमारे यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी दीर्घकाळ कार्य करत लातूरच्या शैक्षणिक उभारणीत मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या कार्यकाळात लातूरचा शैक्षणिक दर्जा उंचावला गेला आणि एक आदर्श शिक्षण पद्धती विकसित झाली. त्यामुळे त्यांना लातूरच्या शैक्षणिक प्रगतीचे शिल्पकार म्हणून गौरवले जाते.

शिक्षण हे सर्वांसाठी असून ते गोर गरीब मुलांपर्यंत पोहोचले पाहिजे ही त्यांची धारणा होती. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विचाराने त्यांनी विविध व्याख्यानमाला, समाजप्रबोधन उपक्रमाचे आयोजन सातत्याने केले त्यामुळे लातूरची एक वेगळी ओळख निर्माण झाली. त्यांच्या प्रेरणेतून अनेक विद्यार्थी आणि युवक घडले.नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून त्यांनी विद्यापीठाला भक्कम पाया घालून सर्वांगीण विकासाची दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्यातील नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली या जिल्ह्यांतील शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन घडून आले.

सार्वजनिक जीवनात त्यांनी प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठा जपत लोकप्रतिनिधी म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले. त्यांचे विचार, कार्यपद्धती आणि समाजहिताची भूमिका सदैव प्रेरणादायी राहील.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो, ही प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली

**-धिरज विलासराव देशमुख**

## ज्येष्ठ विचारवंत डॉ वाघमारे यांचे कार्य कायम स्मरणात राहणारे - आ. कराड

**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षणतज्ञ, ज्येष्ठ विचारवंत, साहित्याचे अभ्यासक, राजकारणाशी समाजकारणीची जोड देऊन कार्य करणारे लातूर पॅटर्नचे जनक माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांचे कार्य कायम स्मरणात राहणारे असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी त्यांच्या दुःखद निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

लातूरचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लातूरच्या विकांसासाठी मोठे प्रयत्न केले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून प्रभावी कार्य केले संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या लातूरच्या शाहू महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा असून शिक्षण क्षेत्रातील लातूर पॅटर्नचे जनक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. खासदार म्हणून राज्यसभेवर डॉ. वाघमारे सरांना काम करण्याची संधी मिळाली. शिक्षण सामाजिक न्याय आणि वंचित घटकाच्या प्रश्नावर त्यांनी संसदेच्या सभागृहात प्रभावीपणे भूमिका मांडली असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि मानव संसाधन तसेच कृषी क्षेत्र संसदीय स्थायी समिती सदस्य म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्धन वाघमारे यांनी पुरोगामी साहित्य चळवळीवर सखोल अभ्यासपूर्ण लेखन आणि संशोधन केले असून शिक्षणाचा विस्तार तळागाळापर्यंत व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील होते.

शिक्षणतज्ञ डॉ. जनार्धन वाघमारे यांचे कार्य कायम स्मरणात राहणारे आहे. डॉ वाघमारे सर आणि डॉ. वि. दा. कराड सर यांचे व कराड कुटुंबीयाचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. आज सोमवारी सकाळी लातूर येथील निवासस्थानी त्यांचे दुःखद निधन झाले. या दुःखद निधनाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि वाघमारे परिवारास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशी प्रार्थना केली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भ्रष्टाचार हा लागलेला प्रगतीस कलंक

भ्रष्टाचारात पुढे कोण असेल हा साधा प्रश्न विचारला तर कोणीही सहज सांगेल अशी काही प्रशासनातील विभागाची महंती आहे म्हणूनच सांगेल. भ्रष्टाचार हा शिष्टाचार नसावा. भ्रष्टाचार अलिकडील नाही पुर्वीपासूनच आहे. पुर्वी विविध मार्गाने लाच घेतली जात होती, आता केवळ पैसा घेतला जातो. पुर्वी व आताचा हा फरक पाहिला तर पुर्वी जशी भिती व जरब होती ती आता भ्रष्टाचार करणाऱ्यात दिसून येत नाही. पुर्वी गैरमार्गाचा आवलंब करायाचा झाला तर घाबरत होते. आता शिपायापासून ते थेट मोठ्या साहेबापर्यंत भ्रष्ट मार्गाचा आवलंबला जातो. त्यामुळे वेळीच भ्रष्टाचारास आळा आवघड दिसून येत आहे. आलिकडे कोणाचेही भिती उरली नाही. वरिष्ठांची तर अजिबात घाबरत नाहीत. वास्तविक ज्यांची प्रतिमा स्वच्छ असते त्याला जग घाबरत असते. तसी प्रतिमा निर्माण करावी लागते. भ्रष्टावर संपला पाहिजे त्याबरोबर तो संपविला पाहिजे. ते शक्य आहे. कोणत्याही कामात दिरंगाई होता कामा नये. दिरंगाई केली गेली किंवा होत असेल तर त्यात भ्रष्टाचाराचा आवलंब होणार हे निश्चित समजाला जातो. आज या, उद्या या म्हणजे त्याला चिरीमिरी द्यावी लागते असा समज निर्माण होतो. ते योग्य आहे. भ्रष्टाचाराचे प्रकार अनंत आहेत. एक नाहीत. कोणी पुस्तकात ठेवा म्हणतो तर कोणी बाजूच्या पानपट्टी किंवा चहाच्या टपरीत द्या असे सांगतो. ही वस्तूस्थिती आहे. याचा अनुभव अनेकांना आलाही असेल. पुर्वी गैरमार्गाचा म्हणजे भ्रष्टाचार उघडा पडला तर मोठी शिक्षा होत होती तशी तरतुद होती. आता सरकारी कर्चचारी जर भ्रष्टाचारात सापडला तर पोलिस कोठडी मिळते. त्यानंतर त्याला सस्पेंड केले जाते. चौकशी होते. चौकशीत काय होते! यात न जाता परत त्याला कामा वर घेतले जाते. ही एक प्रक्रिया आहे. अगोदर भ्रष्टाचाराचा आरोप नंतर धुतल्या तांदळासारखे! ही जी प्रक्रिया आढळून येते ती अयोग्य आहे. कमी पैशाचा किंवा अधिक पैशाचा भ्रष्टाचार हा मोठा गुन्हा समजला जातो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात आधारकार्ड नव्हते. मोफत धान्य मिळत नव्हते. पेंशन नव्हती, लाडकी बहीण योजना नव्हती तरी आजही छत्रपतींचा काळ चांगला म्हणतात, कारण त्यावेळी न्यायी कारभार व न्याय तत्परतेने मिळत होता. महिलांवर हात टाकला तर हात छाटला जात होता. आता मानवाधिकार पुढे येतो का नाही? पुर्वी नियम व कायदे कडक होते, त्याची अमलबजावणी त्वरीत होत होती. तातडीने निर्णय क्षमता होती. कारभारात ढवळा-ढवळ होत नव्हती. आता पकडला तर वरच्यांचा फोन आलाच! सोडून द्या? काय करावे समोरच्यांनी, त्यापेक्षा चिरीमिरी घेवून मजा मारली तर काय बिघडते. तसे कोण धुतल्यातांदळासारखा आहे? अशी जी मनस्थिती आहे तीला विराम देणारा योद्धा जन्मला पाहिजे. तशी मानसिकता निर्माण झाली पाहिजे. देणार नाही किंवा घेणार नाही असे ठरविले तर कामे होतील का? असे का मनाला वाटते कारण कामे होण्याची शाश्वती मिळत नाही. सरकारचे ठोस धोरण नाही. मजबुत धोरण असेल तर घाबरण्याचे कारण नाही. कनिष्ठाची तक्रार वरिष्ठाकडे केली तर त्याची तो दखल घेईलच असे नाही. त्यापेक्षा कनिष्ठांकडेच देवाण-घेंवान करून काम करून घेतले असते तर... असे मनाला वाटते. त्यामुळे जनतेच्या मनात अजूनही काही दिल्याशिवाय काम होत नाही अशी धारणा घर करून आहे. ती दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी केवळ वरिष्ठाने प्रामाणिक वागण्याचे ठरले तर निश्चित चांगला फरक दिसून येतो. आज सध्याला एखादी बाब घडल्यावर न्याय कोणाकडे मागावा हा मोठा प्रश्न समोर उभा राहातो. त्यापेक्षा ऐंशी काय शंभर देवून कामे करून घ्या अशी मानसिकता वाढीस लागत आहे ती घातक आहे. ती बरबादीचे कारण ठरणारी आहे. स्वच्छ प्रशासन केवळ बोलण्यात चांगले वाटते प्रत्यक्षात नाही. आज खाजगी रुग्णालयात जावा किती पैसे मोजावे लागतता. एक कागद सरकारी दप्तरातून काढून घ्यायचा झाला तर कसा अनुभव येतो. या बाबत विचार केला पाहिजे. त्यामुळे वेळीच विचार करून चालावे लागेल. नसता एकदा भ्रष्ट यंत्रणा निर्माण झाली तर त्यात सुधारणा करणे आवघड होणार आहे. पुर्वी शिक्षणाचे प्रमाण कमी होते आता घर तेथे शिकलेला दिसून येतो. त्याच प्रमाणात गैरप्रकार वाढला आहे. आभाळ फाटल्यावर ढिगल कसे लावणार तसे भ्रष्टाचाराचे स्वरून बनले आहे. त्यामुळे कोणतीही मोफत सुविधा नसताना, छत्रपतींचा काळ का आजही चांगला म्हणतात याचा विचार करावा. आज पगारी चांगल्या आहेत. मजुरांना मजुरी चांगली आहे तरी माजुरीपना वाढला आहे. माणुसकीपना लोप पावला जात आहे. काही झाले तरी यावर मात केली पाहिजे. शासनाने कडक धोरण स्विकारले पाहिजे. गैरप्रकार केल्यास गय केली जावू नये. आज सर्व काही चांगले आहे. पगारी, मजुरी, कर्जाची सोय, मोफत सुविधा, महिणाभराचे धान्य मोफत, भत्ते, श्रावणबाळ योजना, निराधारांना मदतीची योजना अशा कितीतरी मोफत योजना आहेत. नोकरीत सवलती आहेत. कामगारांना सोयी दिल्या जात आहेत तरी राष्ट्राविषयी प्रेमाची भावना नाही. राष्ट्रावर प्रेम नाही. राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान करण्यात सर्वात पुढे, राष्ट्राचे विभाजनास कारणीभुत ठरत आहेत. ह्या बाबी विचारात घेवून मोठ्या बदलाची गरज आहे. सतत नीतीत बदल होताना दिसून येत आहे. कशासाठी कमवायाचे किंवा खाण्यासाठी, जगण्यासाठी किती लागते याचा एकदा विचार करावा. जीवन हे अनमोल आहे. ते परत-परत मिळेल असे नाही. आहे ते जीवन सुखी, समाधानी व आनंदी जगले पाहिजे. गैरप्रकार व भ्रष्टाचारात कांहीच साध्य होत नाही. पिढी बरबाद होते. घरदार उद्धस्थ होते याचा थंड डोक्यांनी विचार करावा. आज घरा-दारास चांगल्या व्यक्तीची गरज आहे. आपल्या पाल्यास चांगले वळण लावले नाही म्हणून आज आपल्याला वृद्धाश्रमात जीवन जगण्याची वेळ आली आहे. पुर्वी वृद्धाश्रम होते का? कोणी व केंव्हा पासून निर्माण झाले याचा विचार करावा. त्यामुळे भ्रष्टाचार करण्यात कोणतीही मजा नाही उलट मानसिक सजा आहे. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त जीवनाचा आनंद वेगळा आहे तो आजमावण्याचा प्रयत्न करावा. जो पर्यंत देशातील भ्रष्टाचार संपविण्यासाठी प्रयत्न करणार नाही किंवा संपविणार तो पर्यंत समाधानाचे दिवस येणार नाहीत. भ्रष्टाचार कलंक आहे. त्यामुळे या बाबत गांर्भीयाने विचार करून चांगला मार्ग अंगीकारवा.

### लातुरात महा विधी सेवा शिबीर, शासकीय योजनांच्या महामेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

# कायदेविषयक मदतीसोबतच शासनाच्या योजना वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी न्याय संस्था प्रयत्नशील-न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर

* विविध शासकीय योजनांचे वितरण; जनजागृती चित्ररथाला हिरवी झेंडी
* विविध योजनांविषयी भव्य प्रदर्शनी; लातूरकरांनी नोंदविला सहभाग
* शासकीय लाभांचे प्रत्यक्ष वितरण; नागरिकांची आरोग्य तपासणी











**लातूर/प्रतिनिधी :** सर्वसामान्य नागरिक, वंचित घटकांना त्यांच्या हक्क, अधिकारांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन करणे, त्यांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासोबतच आता शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी न्याय संस्था पुढाकार घेत आहे. याचाच एक भाग म्हणून महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या माध्यमातून सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणणे, हा मूळ उद्देश असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांनी सांगितले. तसेच लातूर येथे आयोजित महामेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.जे. भारुका, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा प्रशासनाचे त्यांनी कौतुक केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्यायमूर्ती आणि लातूर जिल्ह्याच्या पालक न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील रुक्मिणी मंगल कार्यालयात महा विधी सेवा शिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. जे. भारुका, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. वाय. डी. जगताप यांची यावेळी उपस्थित होते. प्रारंभी कार्यक्रमाला उपस्थितांचे लेझीम आणि झांज पथकाने स्वागत केले. तसेच पारंपारिक वेशभूषेत आलेल्या बंजारा समाजातील महिलांनी न्यायमूर्तींचे औक्षण केले. रोपट्याला जल अर्पण करून अनोख्या पद्धतीने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तसेच उपस्थित मान्यवरांना रोपटे, व्यक्तीचित्र आणि महिला बचतगटांचे उत्पादन असेलल्या विविध वस्तूंचे कीट भेट देण्यात आले.

न्याय संस्थेने न्यायदान, कायदेविषयक जनजागृती व मदत उपलब्ध करण्यापर्यंत आपले कार्य मर्यादित न ठेवता सर्वसामान्य नागरिक, वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी न्याय संस्था व जिल्हा प्रशासन एकत्रितपणे प्रयत्न करीत आहे. सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करण्यासाठी शासन राबवीत असलेल्या योजनांची माहिती गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविणे. अशा योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून देणे, यासाठी महा विधी सेवा शिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा सारखे उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे न्यायमूर्ती श्री. चपळगावकर यांनी सांगितले.

**'कायदा सर्वसामन्यांच्या दारी' पोहचवण्याचा प्रयत्न : न्यायमूर्ती वैशाली पाटील जाधव**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत हक्क, अधिकार दिले आहेत, मात्र त्याची अनेकांना जाणीव नाही. या हक्क, अधिकारांपासून कोणीही वंचित राहू नये, यासाठी विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून कायदेविषयक जनजागृती करण्यात येत आहे. तसेच गरजूंना कायदेविषयक मोफत मदतही दिली जात आहे. याचाच एक भाग म्हणून महा विधी शिबिरांच्या माध्यमातून 'कायदा आपल्या दारी' पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव यांनी सांगितले.

न्याय हा सामान्य माणसांच्या जीवनातील विश्वास असून तो टिकवून ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. नागरिक कायद्याविषयी जागृत झाल्यास समाजाला शिस्त लागते, भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होते, वादाचे प्रमाण कमी होते. लोकांच्या कायदेशीर गरजा समजून घेवून त्यांना कायदेविषयक योग्य मार्गदर्शन करणे, वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी असे शिबिर उपयुक्त ठरते, असे न्यायमूर्ती श्रीमती पाटील जाधव यांनी सांगितले. तसेच शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य विकासाच्य योजनांचा लाभ घेऊन महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि अर्थसाक्षर बनावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**दुर्बल घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. जे. भारुका**

न्याय सर्वांसाठी या धोरणानुसार राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवर विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. यामाध्यमातून समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय देण्याची हमी शासनाने घेतली आहे. दुर्बल घटक, वंचितांना न्याय मिळवून देण्यासोबतच, शासनाच्या विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी, एका छताखाली मिळावी, यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पुढाकारातून महा विधी सेवा शिबीर, शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे, असे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एस. जे. भारुका यांनी सांगितले. केवळ कायदेविषयक मार्गदर्शनच नव्हे, तर दुर्बल घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण पुढाकार घेत आहे. यासोबतच पात्र लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोहचण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कायदेविषयक जनजागृतीसाठी सोशल मीडियाच्या वापरासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

**सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून कार्यक्रमाचे आयोजन : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे**

जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने महा विधी सेवा शिबीर, शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण भागातूनही मोठ्या संख्येने लाभार्थी, नागरिक सहभागी झाले आहेत. याठिकाणी विविध शासकीय विभागांच्या जवळपास ४२ स्टॉल्सच्या माध्यमातून २०० पेक्षाही अधिक योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या. यासोबतच आरोग्य, महिला व बालकल्याण, कृषी, सामाजिक न्याय यासारख्या विविध योजनांच्या प्रत्यक्ष लाभाचे वितरणही याठिकाणी करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहचवण्यासाठी यामाध्यमातून जनजागृती होत आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून अतिशय चांगला कार्यक्रम याठिकाणी आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

**शासकीय विभागांच्या दालनांना भेट**

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर आणि न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव यांनी महा विधी सेवा शिबीर, शासकीय योजनांचा महामेळावानिमित्त उभारण्यात आलेल्या विविध शासकीय विभागांच्या दालनांना भेट देवून संबंधित अधिकाऱ्यांकडून योजनांची माहिती घेतली. तसेच यावेळी पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरणही करण्यात आले. जिल्हा महिला बालकल्याण विभागामार्फत बालविवाहमुक्तीविषयी जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या चित्ररथाला यावेळी हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष व आरोग्य विभागामार्फत याठिकाणी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरालाही न्यायमूर्ती श्री. चपळगावकर आणि श्रीमती पाटील-जाधव यांनी भेट दिली. या शिबिरात श्रमिक व मजूर, दिव्यांग व्यक्तींसाठी योजना, बालकांशी निगडित मुद्दे, ट्रान्सजेंडर, कारागृहातील कैदीं, अनुसूचित जाती व जमातींसाठी विशेष योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी लाभ, भिकारी व बेघर व्यक्तींसाठी मदत, रस्ता सुरक्षा व अपघात, नैसर्गिक आपत्तीचे पीडित, तस्करीचे पीडित आदीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेणारे न्यायिक अधिकारी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.के. वाघ आणि सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एम.एस. निकम यांनी केले.

**न्यायिक अधिकारी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान**

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर आणि न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव यांच्या हस्ते राहुल आर. भोसले (जिल्हा न्यायाधीश-१), राहुल बी. भागवत (जिल्हा न्यायाधीश-२), संतोष टी. त्रिपाठी (जिल्हा न्यायाधीश-३), संजयकुमार व्ही. जाधव (जिल्हा न्यायाधीश-४), विद्याधर एस. मोरे (तदर्थ जिल्हा न्यायधिश-१), पद्माकर प्र. केस्तीकर (तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२), सतीष एन. पाटील (मुख्य न्यायदंडाधिकारी), जितेंद्र सी. ढेंगळे (सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर), श्रीमती रोहिणी नन्हे-विरोळे (उपविभागीय अधिकारी), श्रीमती सायली ठाकुर (उपजिल्हाधिकारी-सामान्य), बी.डी. वाघ (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद), सुधाकर एम. बावकर (पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा), बी.के. राऊत (प्रबंधक, जिल्हा न्यायालय), जी.व्ही. बिराजदार (अधिक्षक, अतिरिक्त जिल्हा न्यायालय, उदगीर), के.आर. कोकणे (सहाय्यक अधिक्षक, जिल्हा न्यायालय), पी.एम. नाईकवाडे (सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, निलंगा), बी.बी. भांगे (सहाय्यक अधिक्षक, जिल्हा न्यायालय) ए.जे. कोडगिरे (वरिष्ठ लिपीक, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, लातूर) यांचा सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.

# शीख समाजाचा इतिहास उलगडणारे 'विरासत-ए-सीख' प्रदर्शन ठरतंय भाविकांचे आकर्षण




**मुंबई/प्रतिनिधी:** खारघर ओवे मैदान येथे सुरू असलेल्या हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त शीख समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे 'विरासत-ए-सीख' हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हे प्रदर्शन भाविकांसाठी आकर्षण ठरत असून या कार्यक्रमाला उपस्थिती लावलेले भाविक आवर्जून प्रदर्शनाला भेट देत आहेत.

शीख धर्माच्या स्थापनेपासून ते गुरू गोविंद सिंग यांच्यापर्यंतच्या सर्व गुरूंचा इतिहास, त्यांनी दिलेले योगदान सचित्र स्वरूपात मांडण्यात आला आहे. विशेषतः हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबत शीख योद्ध्यांनी वापरलेली विविध शस्त्रास्त्रे या प्रदर्शन दालनात ठेवण्यात आली आहेत. शीख धर्माचे पहिले गुरु श्री गुरु नानक जी ते शेवटचे गुरु गोविंद सिंगजी यांचा इतिहास व श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख धर्मासोबतच सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव समाजातील महापुरुषांचाही इतिहास या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आला आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहिदी समागमनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले भाविक आवर्जून 'विरासत-ए-सीख' या प्रदर्शनाला भेट देत आहेत.

# हिंद-दी-चादर' समागम कार्यक्रमात भव्य लंगर व्यवस्था; लाखो भाविकांनी घेतला लंगर सेवेचा लाभ

**मुंबई/प्रतिनिधी:** हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात भाविकांसाठी भव्य लंगरची व्यवस्था करण्यात आली आहे. लाखो भाविक या लंगर सेवेचा लाभ घेत असून संपूर्ण परिसर सेवाभाव आणि समतेच्या संदेशाने भारावून गेला आहे. आज पहिल्या दिवशी अंदाजे दोन लाखांपेक्षा अधिक भाविकांनी लंगर सेवेचा लाभ घेतल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर व्यवस्था सुरू असून सर्व धर्मीय भाविकांना भोजन दिले जात आहे. संपूर्ण परिसरात आठ ठिकाणी लंगर सुरू असून एका वेळेस एका लंगर मध्ये सुमारे दोन ते अडीच हजार भाविकांना एकत्रितपणे भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत अखंडपणे भोजन व्यवस्था सुरू असून स्वयंसेवक आणि सेवाभावी संस्थांच्या मदतीने वाढप, स्वच्छता व व्यवस्थापन सुरळीत पार पडत आहे.स्वयंसेवक, सेवाभावी संस्था आणि गुरुद्वारातील सेवादार यांच्या संयुक्त प्रयत्नातून अन्न तयार करणे, वाढप, स्वच्छता आणि व्यवस्थापनाची चोख जबाबदारी पार पाडली जात आहे.

लंगरमध्ये पारंपरिक पद्धतीने रोटी, भाजी, डाळ, भात तसेच गोड पदार्थांची व्यवस्था करण्यात आली आहे. हजारो स्वयंसेवक सेवेत सहभागी झाले असून 'सेवा' हीच खरी श्रद्धा असल्याचा संदेश या माध्यमातून दिला जात आहे.

# राज्यसभेसाठी रस्सीखेच

विधानसभेतील संख्याबळानुसार महायुतीला सहा, तर महाविकास आघाडीला एक जागा मिळू शकते; पण या एका जागेवरून आघाडीतच दावे-प्रतिदावे सुरू झाल्याने ही एकमेव जागा तरी महाविकास आघाडी राखणार का? अशी शंका येऊ लागली आहे.

येत्या मार्चमध्ये राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक होत असून त्यापैकी सात जागा महाराष्ट्रातील आहेत. विधानसभेच्या सदस्यांमधून या जागा भरल्या जातात. त्यानुसार महायुतीला सर्वाधिक जागा जिंकण्याची संधी आहे.

विधानसभेतील पक्षीय बलाबलानुसार महाविकास आघाडीच्या वाट्याला एक जागा येण्याची हमखास निवडून येण्याची संधी असली तरी आपसातील स्पर्धेमुळे कदाचित ही जागा गमावण्याची शक्यता आहे. येत्या एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त होणार्या सात जणांत ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश आहे. ते राज्यसभेवर पुन्हा जाणार का, याविषयी चर्चा सुरू आहे. सध्या प्रकृती अस्वास्थामुळे ही निवडणूक लढवण्याविषयी त्यांनी स्वतः भाष्य केलेले नाही. खासदार सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडीने एकमत केल्यास शरद पवार राज्यसभेवर जातील असे म्हटले आहे. पवार यांचे सर्व पक्षीय संबंध आहेत. त्यांच्या ज्येष्ठत्वामुळे आणि राजकारणातील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे त्यांनी निवडणूक लढवण्याची तयारी दाखवल्यास ही निवडणूक बिनविरोध होऊ शकते. अशा स्थितीत महायुतीचे सहा आणि महाविकास आघाडीचे शरद पवार राज्यसभेवर बिनविरोध निवडून जाऊ शकतात; मात्र शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी या आधी शरद पवार यांची राज्यसभेवर जाण्याची इच्छा असल्याचे म्हटले असतानाच त्याच पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिवसेनेच्या वतीने प्रियांका चतुर्वेदी यांना राज्यसभेवर पुन्हा पाठवण्याची तयारी चालवली आहे. सदस्य संख्येनुसार ही संधी ठाकरे गटाला मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे काँग्रेसनेही आपला उमेदवार उभा करण्याची तयारी चालवली आहे. राष्ट्रीय स्तरावरील राजकारणासाठी काँग्रेसला राज्यसभेतील आपले बळ वाढवायचे असल्याने ही जागा लढवण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले आहे. पवार यांची उमेदवारी नसल्यास महाविकास आघाडीतच उमेदवारीवरून रस्सीखेच होणार हे उघड आहे.




**पवारांची भूमिका महत्त्वाची**

महायुतीमध्ये या जागांसाठी २५ जण उत्सुक असले तरी चार-पाच नावावर एकमत झाल्याची माहिती पुढे आली आहे. दिल्लीत पक्ष श्रेष्ठांच्या मान्यतेनुसारच उमेदवारी निश्चित होईल. विधानसभेत सध्या २८६ सदस्य आहेत. त्यातून सात जणांची निवड केली जाणार आहे. प्रत्येक उमेदवार किमान ३७ मताच्या आधारे निवडून येऊ शकतो. भाजपच्या सदस्य संख्येनुसार तीन जण सहजपणे निवडून जाऊ शकतात. शिवाय त्यांच्याकडील २८ मते अतिरिक्त उरतात. शिवसेना शिंदे गटातून १ जण निवडून येऊ शकतो. शिवाय त्यांची २० अतिरिक्त मते उरतात राष्ट्रवादी (अजित पवार) चा एक उमेदवार निवडून गेला तरी त्यांचीही ४ मते अतिरिक्त उरतात. अशा अतिरिक्त ५२ मतांमधून महायुतीचा आणखी एक उमेदवार असे एकूण सहा उमेदवार निवडून येऊ शकतात. हा सहावा उमेदवार निवडून गेल्यावरही महायुतीकडे १६ जादा मते उरतात. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मतांच्या फोडाफोडीवर महायुती आणखी एखादा उमेदवारही निवडून आणू शकतो. आता खरी कसोटी आहे ती महाविकास आघाडीची. महाविकास आघाडीचा एकच उमेदवार असेल, तर तो विनासायास निवडून येईल किंवा काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) यांनी एकमताने उमेदवार दिल्यास तोही निवडून येऊ शकतो; मात्र या दोन्ही पक्षांनी उमेदवारीचा दावा केल्यास आघाडीत पेच निर्माण होऊ शकतो. महाविकास आघाडीतील या फाटाफुटीचा फायदा महायुतीला होऊ शकतो. मते फोडून किंवा मतदानाला काहींना गैरहजर ठेवून किंवा पसंतीक्रमाची निश्चिती करून महायुती ही सा-तवी जागाही पदरात पाडून घेऊ शकते. शरद पवारांच्या नावावर महाविकास आघाडीत एकमत होऊ शकते; मात्र आता ते सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेणार का आणि नवीन उमेदवाराला संधी देणार का हे पाहावे लागेल. पवारांच्या उमेदवारीमुळे आणि त्यांच्या ज्येष्ठत्वामुळे महायुतीलाही फोडाफोडीचे तंत्र नैतिकदृष्ट्या अडचणीचे ठरेल. महाविकास आघाडी पवारांच्या प्रभावांचा विचार करणार की, त्यातील प्रत्येक पक्ष आपले राजकारण साधणार हे लवकरच समजेल.

# उन्हाळ्यात सायनसचे प्रमाण का वाढते?

## हा त्रास कमी करण्यासाठी कोणते घरगुती उपाय करणे फायदेशीर ठरते?

डळपींी चा त्रास कमी व्हावा म्हणून उन्हाळ्यात या टिप्सची मदत घेता येते. उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे शरीरावर नकारात्मक परिणाम होतो. या कालावधीमध्ये वाता-वरणातील बदलांमुळे सर्दी-पडसं होण्याची शक्यता असते. अशात जर एखाद्याला सायनस असेल, तर त्या व्यक्तीला अधिक त्रास सहन करावा लागतो. उन्हाळ्यामध्ये उष्ण आणि कोरड्या हवेमुळे सायनसचा त्रास वाढत जातो. यामुळे सर्दी, डोकेदुखी आणि ताप असे आजार बळाव-तात. बऱ्याचजणांना उन्हाळ्यात सायनसचा त्रास सुरु होतो. यावर मात करण्यासाठी डॉक्टरांची मदत घेणे आवश्यक असते. गरम वातावरणामध्ये काही घरगुती उपाय केल्यानेही सायनसचा त्रास कमी होऊ शकतो.



आपल्याकडे तीन ते चार महिन्यांच्या कालावधीमध्ये कडक उन्हाळा असतो. सकाळी १० ते दुपारी ३ यांमध्ये सूर्य आग ओकतोय की काय इतक्या प्रमाणात उन्हाचा तडाखा बसत असतो. अशा वेळी एसी किंवा पंख्याचा वापर करून थंडावा मिळवण्याचा प्रयत्न केला जा-तो. थंड वातावरणात बसून पुन्हा उन्हामध्ये गेल्याने सर्दी होण्याची शक्यता बळावते. याशिवाय थंड पदार्थ खाल्यानेही अशी स्थिती उद्भवते. अशा वेळी सर्दीसह सायनसचा त्रास व्हायला सुरुवात होते. उन्हाळ्यात चा त्रास होऊ नये म्हणून काय करावे?

१. गरम पाण्याची वाफ घ्यावी.

नाकामध्ये संसर्ग झाल्याने सायनस होत असतो. गरम पाण्याची वाफ नियमितपणे घेतल्याने हा त्रास नाहीसा होऊ शकतो. वाफेमुळे श्वासनलिका स्वच्छ होते. त्याशिवाय संक्रमणासाठी कारणीभूत असलेले विषाणू देखील नष्ट होतात. उन्हाळ्यात कोरड्या हवेमुळे ही नलिका कोरडी होऊ शकते. वाफ घेतल्याने श्वासनलिकेमध्ये ओलावा टिकून राहतो. हा उपाय दिवसातून दोन वेळा केल्याने सायनसवर काही प्रमाणात आराम मिळू शकतो.

२. गरमागरम सूप प्यावे.

सायनस झालेल्या व्यक्तीची श्वासनलिका घट्ट होते. उन्हाळ्यात हा त्रास वाढत जातो. यावर उपाय म्हणून गरमागरम सूप पिण्याचा सल्ला दिला जातो. दिवसातून दोन वेळा सूप प्यायल्याने श्वासनलिकेला आलेली सूज कमी होते. यामुळे संक्रमणाचे प्रमाण देखील कमी होते. या पदार्थामध्ये विविध मसाल्यांचा समावेश करावा. यामुळे शरीराला फायदा होतो. सूपप्रमाणे हर्बल टी चे सेवन केल्याने सायसनचे प्रमाण कमीकमी होत जाते.

# जोडीदाराशी संबंध तोडण्याची अशीही अजब कारणे

एक काळ असा होता जेव्हा आपल्या जोडीदाराशी संबंध तोडून टाकण्याचा विचार करणे देखील लोकांना अवघड वाटत असे. स्वत:ची इभ्रत आणि लोकलज्जा या गोष्टींपायी नात्यामध्ये कितीही कटुता, असामंजस्य असले, तरी जोडीदाराशी नाते शेवटपर्यंत टिकून ठेवण्याचे प्रयत्न केले जात असत. पण आता काळ बदलला तशी मते, विचारधाराही बदलली, व्यक्तीस्वातंत्र्य आले. स्त्रिया आणि पुरुष हे दोघेही स्वाभिमानी आणि स्वावलंबी झाल्याने मतभेद झालेच तर माघार न घेता, किंवा आपले जुळणे शक्य नाही हे लक्षात येताच वेगळे होऊन आपापल्या मार्गाने जाण्याची प्रथा रूढ होताना दिसू लागली. अशा प्रकारचे मतभेद असताना नातेसंबंध तोडून टाकून नव्या आयुष्याला सुरुवात करणे योग्य असले, तरी अनेकदा अतिशय क्षुल्लक कारणांवरून नातेसंबंध तुटतानाही पहावयास मिळू लागले. पाश्चात्य देशांमध्ये हे प्रमाण खूपच वाढले. असेच काही प्रसंग काही मंडळींनी सोशल मिडियावर नुकतेच शेअर केले आहेत.



रिलेशनशिपबद्दलचे हे किस्से खूपच रोचक आहेत. एका तेवीस वर्षीय तरु-णीने आपल्या जोडीदाराशी ङ्गब्रेक अपफ झाल्याचे कारण सोशल मिडियावर शेअर केले आहे. या तरुणीला ङ्गगेम ऑफ थ्रोन्सफ ही मालिका अतिशय आवडत असून, या मालिकेचा प्रत्येक भाग तिला तिच्या बॉयफ्रेंडसोबत पाहण्याची इच्छा असे. पण तिचा बॉयफ्रेंड प्रत्येक भागाची कथा तिला आधीच सांगून टाकत असल्याने ही मालिका पाहण्याच्या उत्सुकतेवर पाणी पडत असे. अखेरीस आपल्या बॉयफ्रेंडच्या या सवयीला कंटाळून जाऊन या तरुणीने त्याच्याशी असलेले आपले नाते तोडून टाकल्याचे म्हटले आहे. मालिकेबद्दल आपल्या मनामध्ये असलेल्या उत्सुकतेवर नेहमीच पाणी पडत असल्याने आपण हे नातेसंबंध तोडून टाकल्याचे या तरुणीचे म्हणणे आहे.आणखी एका तरुणीने सोशल मिडियावर आपल्या ङ्गब्रेकअपफ चा किस्सा सांगितला आहे. ती आणि तिचा बॉयफ्रेंड एकत्र सुट्टीसाठी गेले असताना तिचे फोटो घेण्याऐवजी तिचा बॉयफ्रेंड आसपासच्या सुंदर निसर्गाची छायाचित्रे टिपू लागला. यामुळे रागावून तिने आपल्या बॉयफ्रेंड बरोबरचे आ-पले नाते संपवून टाकल्याचे म्हटले आहे. तर एका तरुणाने आपल्या मैत्रिणीच्या सोबत ङ्गटेक अवेफ डिनर, खात असताना त्याच्या मैत्रिणीने वापरलेले टिश्यू पेपर त्याच्या कारच्या खिडकीतून बाहेर फेकल्याने तिच्याशी असलेले संबंध कायमचे संपविल्याबद्दल लिहिले आहे. एकाने आपल्या मैत्रिणीची नखे खूपच लांब असल्याने तिच्यासोबत आपण ङ्गब्रेकअपफ केल्याचे म्हटले आहे, तर आणखी एका तरुणाने आपली मैत्रीण काहीही खात असताना भयंकर आवाज करीत असल्याच्या कारणावरून संबंध कायमचे संपविल्याचे म्हटले आहे.



## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**लैंगिक ताठरतेमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या कसे रोखाल?**



संशोधनानुसार, लैंगिक ताठरतेच्या समस्या रोखण्यासाठी फ्लॅव्होनाईट्स सेवन करणं आवश्यक आहे. अभ्यासानुसार ब्ल्यूबेरीमध्ये आढळणारं अ‍ॅन्थोसायनिन हे एक प्रकारचं फ्लॅव्होनाईड आहे. तसंच इतर लिंबूवर्गीय फळांमध्ये ते आढळून येतं. फळांच्या सेवनामुळे लैंगिक समस्येत १४ टक्क्यांपर्यंत सुधारणा होऊ शकते. फ्लॅव्होनाईडयुक्त आहाराचे सेवन तसेच व्यायाम यांच्या मदतीने ही समस्या २१ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. त्यामुळे आपल्या आहारात फळांचा अधिक समावेश करायला हवा.

## २ Joke — विनोद




पिंटू शाळेतील पहिल्या दिवशी जाऊन घरी आला व आईला म्हणाला, ङ्गआई, बाईंनी विचारले की, तुला आणखी काही लहान भावंडे आहेत का?फ तेव्हा पिंटू म्हणाला की ङ्गना-हीतफ तेव्हा बाईंनी नि:श्वास सोडला व म्हणाल्या, ङ्गदेव पावला.

## ३ Message — संदेश



Kutton ka TV Serial
Agar Kutton ka TV pr 1 Channel ho to Socho Usme Serials ke Naam kuch Aise honge. .Yahan Me Gahr Gahr BHONKI .KAAT KHANA Sathiya .Agle Janam mohe KUTIYA hi kijo .Me KUTIYA Tere Aangan ki .Ye KUTTA kya Kehlata hai .Ek Hazaro me Meri Kutiya hai .Afsar Kutiya Is Kutte ko kya Naam dun Bade Kutte lgte hen..

## ४ Thought — सुविचार



निष्काम कर्म म्हणजे कर्मत्याग नव्हे.
- भगवद्गीता


**संस्कृत सुभाषित**

**अद्रोहं सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा**
**अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ।।**

(शांतीपर्व, अध्याय १२४, श्लोक ६६, महाभारत)

अर्थ : कृतीने, मनाने आणि वाणीने कोणत्याही प्राण्यास त्रास न देणे, परोपकार करणे, दान करणे या प्रकाराचे शील प्रशस्त होय.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. अननुभवी
५. देवापाशी मागितलेला निर्णय
६. पवित्र
९. एक सुगंधी वनस्पती
१०. जंगलातील प्राणी
१२. वारा
१३. वाईट असल्यास आयुष्य नासवणारी
१४. नासाडी, नाश
१५. हात
१६. चटकन
१८. शपथ
१९. भाज्या घालून केलेला भात
२०. सरसकट
२२. खानदान, कूळ
२३. रमापती
२५. दारूचा प्रकार
२६. कपाळ
२७. कशा प्रकारचा?
२९. वर्ष
३१.गाडीचे छत
३३. सोन्याचा धागा
३४. सुंदर तरुणी
३५. डोळे
३६. असह्य वेदना
३८. लक्ष्मी
४२. पंचमहाभूतापैकी अग्नीचे रूप
४३. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
४६. आकर्षक
४८. मूळ अर्थ धनुष्य, उद्धट, दांडगा (ला.)
४९. यापेक्षा फळे चिरून खाणे चांगले!
५०. च्या बरोबर
५१. क्षण (हिंदी)
५३. भंगार (हिंदी)
५५. अस्सल मातीतले
५६. खुंट, आंचळ
५७. घाबरट
५९. सुविधा
६०. हक्क सांगणारा, वैरी
६२. मध
६४. पांढुरका, कडक
६६. नासाडी, धूळधाण
६८. पत्र, टपाल
६९. गवताचे पान
७०. डोंगराचा सुळका, पोळीची किनार
७२. वाळवंटातून आलेला फुलांचा राजा
७४. स्तुती करणारा दरबारी
७५. स्वत:ला
७६. रघुपती बरोबर घेतली जाणारी रामाची आणखी दोन नावे
८०. दाक्षिणात्यांच्या जेवणातील हा पदार्थ इतका मुख्य की त्याला 'अन्न' असेच संबोधतात
८१. मृत्यू नसलेला
८२. पकडण्याचे साधन- मासा किंवा काहीही!
८३. चांदोबाची खेळण्याची जागा

### उभे शब्द

१. 'फारच मोठे प्रास्ताविक' याअर्थी प्रचलित म्हण
२. उत्तराधिकारी
३. रानरेडा
४. प्रतिष्ठा
५. गांधारीचे पुत्र
६. पोटाला चांगला नसलेला पोळीला पर्याय
७. अरण्य
८. यंदा पावसाळ्यात अशा पावसाचा अभावच होता
१०. वरपांगी
११. एवढी तरी हवीच अशी हालचाल
१२. घागरा
१३. समस्या, पेच
१५. विद्या
१७. सत्व
१८. दूध न देणारी गाय
१९. पुण्याचा रहिवासी
२१. घोडागाडी
२४. मत्स्य
२६. हिंदुस्तान
२८. चाणक्यनीती
३०. सोन्याचे नाणे
३२. उद्याच्या नंतरचा दिवस
३३. जय मिळवून देणारे
३७. विविध
३९. मस्ती, गर्व
४०. समय
४१. आजपर्यंत
४३अ. वजनाला भारी
४४. किंमत
४५. सैन्याचा दाणागोटा
४६. महात्मा गांधीजींचे नाव
४७. चषक
४८. फरशीनंतर असलेला लादीचा प्रकार
५०. सरळ मोठा वासा
५२. मनाची इच्छा
५३. टाळ्यांनी मिळालेली मोठी दाद
५४. विरोध, प्रतिबंध
५६. विषमच्या विरुद्ध
५८. भीती
६१. प्रमाणपत्र
६३. कधी रावाचा होतो, कधी याचा राव!
६५. पोस्ट ऑफीस (हिंदी)
६७. नट्टापट्टा
६९. पाचोळा
७१. खेळी
७३. पोशाखाची कळ
७४. नशीब, दैव
७५. अभिप्राय
७६. राघव
७७. संताप
७८. अग्नी, ज्वाळा
७९. अंत:करण

### आडवे उत्तरे

१.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२.मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण

### उभे उत्तरे

१.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टमटम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ.जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### शिमरॉन हेटमायरचा जलवा! टी-२० वर्ल्डकप इतिहासात

दिल्ली–भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात करो या मरो सामना खेळवला जात आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजच्या शिमरॉन हेटमायरने वादळी सुरूवात केली. हेटमायर यंदाच्या टी–२० विश्वचषकात वादळी फॉर्मात आहे. त्याने जणू काही षटकारांची आतिषबाजी केली आहे. यासह त्याने टी–२० वर्ल्डकपमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. वेस्ट इंडिजने फलंदाजीला सावध सुरूवात केली. भारताच्या गोलंदाजांनी चांगली सुरूवात करत विकेट्स घेतल्या नसल्या तरी धावाही दिल्या नाहीत. पण शिमरॉन हेटमायरने येताच फटकेबाजीला सुरूवात केली आणि त्याने षटकार खेचताच मोठा विक्रम आपल्या नावे केला.शे होप झेलबाद झाल्यानंतर शिमरॉन हेटमायर फलंदाजीला आला. त्याने येताच पुढील षटकात षटकार खेचला आणि फॉर्म दाखवून दिला. शिमरॉन हेटमायरला बुमराहमुळे या सामन्यात फक्त १२ चेंडू खेळण्याची संधी मिळाली. बुमराहच्या लेंग्थ चेंडूवर खेळायला जाताना चेंडू त्याच्या बॅटची कड घेत संजू सॅमसनकरवी झेलबाद झाला.

### अंपायरनंतर थर्ड अँपायरनेही आऊट दिले, तरी वेस्ट इंडिज खेळाडूचा राडा

मुंबई,–टी२० वर्ल्डकपमध्ये आज भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात रोमांचक सामना सूरू आहे. या सामन्यात जसप्रीत बुमराहच्या ओव्हरला मोठा ड्रामा झाला आहे. वेस्ट इंडिजच्या खेळाडूला अंपायरने आऊट दिलं त्यानंतर थर्ड अंपायरच्या निर्णयात देखील तो आऊट झाला. तरी देखील या खेळाडूने मैदानात मोठा राडा झाला होता.

खरं तर वेस्ट इंडिजचा शाई होप बाद झाल्यानंतर संघाची संपूर्ण भिस्त ज्या खेळाडूवर होती तो शिमरन हेटमायर मैदानात आला होता.भारताविरूद्ध तो खतरनाक फलंदाजी करेल असे वाटत होते. पण भारतानो त्याला २७ धावातच गुंडाळले होते. त्याचं झालं असं की भारताने शिमरन हेटमायरला आधीट बुमराहला राखीव करून ठेवले होते. त्यामुळे तो फलंदाजीला येताच बुमराहला पाचारण करण्यात आलं होतं.बुमराहच्या पहिल्या दोन बॉलनंतर तिसऱ्या बॉलवर हेटमायर बॉल मारत असताना त्याच्या बॅटीला कड लागून संजू सॅमसनच्या हातात गेली होती.

### लुंगी एन्गिडीने घडवला इतिहास! अशी कामगिरी करणारा ठरला पहिलाच गोलंदाज

दिल्ली–आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत दक्षिण आफ्रिका संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. दक्षिण आफ्रिकेने आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली आहे. याच कामगिरीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने सेमी फायनलमध्ये प्रवेश निश्चित केला आहे. दक्षिण आफ्रिकेचा साखळी फ `रीतील शेवटचा सामना झिम्बाब्वेविरूद्ध पार पडला.या सामन्यात गोलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी गोलंदाज लुंगी एन्गिडीने १ गडी बाद केला. यासह त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.लुंगी एन्गिडी या सामन्यातील दुसरे षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला.या षटकात गोलंदाजी करताना त्याने संघातील अनुभवी फलंदाज रायन बर्लला बाद करत माघारी धाडलं. त्याने भन्नाट वेगाने चेंडू टाकून रायन  लुंगी एन्गिडी हा दक्षिण आफ्रिकेसाठी टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक गडी बाद केले.

### पाकिस्तान बाहेर पडल्यानंतरही आयसीसी कडून मिळणार कोट्यवधी रूपये, रक्कम ऐकून थक्क व्हाल

**दिल्ली**–टी–२० विश्वचषक २०२६ अखेरच्या टप्प्यात येऊन पोहोचला आहे. सेमीफायनलसाठीचे ३ संघ ठरले असून आता २ संघांमध्ये अखेरच्या स्थानासाठी चुरशीची लढत होणार आहे. याशिवाय इतर ४ संघ सुपर–८ टप्प्यातून बाहेर पडले आहेत. ज्यापैकी एक असलेल्या पाकिस्तान संघाची टी२० विश्वचषकात फारशी प्रभावी नव्हती. जिथे सुपर–८ फेरीत त्यांना फक्त १ सामना जिंकता आला. वर्ल्डकपमधून बाहेर पडूनही पाकिस्तान क्रिकेट संघाला आयसीसीकडून चांगली रक्कम मिळणार आहे.टी–२० विश्वचषक सुपर–८ टप्प्यानंतर आता पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे हे संघ बाहेर पडले आहेत. आयसीसीच्या बक्षीस रकमेच्या धोरणानुसार, सर्व सहभागी संघांना स्वतंत्र बक्षिसे दिली जातात.

# भारताची सेमी फायनलमध्ये! सॅमसनचा वेस्ट इंडिजला तडाखा

## भारतीय संघाने ५ गडी राखून विजयाची नोंद

### संजू सॅमसनची दमदार खेळीने ठरला सामनवीर

**नवी दिल्ली:** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात झालेल्या निर्णायक सामन्यात भारतीय संघाने दमदार विजयाची नोंद केली आहे. यासह स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे.आयसीसी टी –२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील निर्णायक सामना भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना दोन्ही संघांसाठी क्वार्टर फायनलचा सामना होता. कारण जो संघ जिंकणार तो थेट सेमी फायनलमध्ये प्रवेश करणार होता. या महत्वाच्या सामन्यात वेस्ट इंडिजने भारतासमोर विजयासाठी १९६ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने ५ गडी राखून विजयाची नोंद केली आहे. भारताकडून संजू सॅमसन हा विजयाचा हिरो ठरला.

भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १९६ धावा करायच्या होत्या. निर्णायक सामन्यात वेस्ट इंडिजसारख्या बलाढ्य संघासमोर इतक्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करणं मुळीच सोपं काम नाही. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले. सलामीला आलेला अभिषेक शर्मा अवघ्या १० धावा करून माघारी परतला. तर इशान किशन देखील १० धावा करून माघारी परतला. कर्णधार सूर्यकुमार यादवकडून या सामन्यात मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण तो अवघ्या १८ धावा करून माघारी परतला. त्यानंतर तिलक वर्मा आणि संजू सॅमसनने मिळून संघाचा डाव सांभाळला. दोघांनी महत्वपूर्ण भागीदारी केली. तिलक वर्मा २७ धावांवर माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या हार्दिक पांड्याने १७ धावांचे योगदान दिले. पण सलामीला आलेला संजू सॅमसन शेवटपर्यंत उभा राहिला. संजूने नाबाद ९७ धावांची खेळी करून भारतीय संघाला सेमी फायनलमध्ये प्रवेश मिळवून दिला. संजू सॅमसनची दमदार खेळी संजू सॅमसनला आधी प्लेईग ११ म ध्ये स्थान मिळणंही कठीण झालं होतं. पण जेव्हा संधी मिळाली, तेव्हा त्याने संधीचं सोनं करून दाखवलं आहे. भारतीय संघाला आज त्याची सर्वात जास्त गरज होती. या संधीचा त्याने पुरेपूर फायदा घेतला. सलाम ीला फलंदाजीला आल्यानंतर तो शेवटपर्यंत खेळपट्टीवर टिकून राहिला. त्याने ५० चेंडूत नाबाद ९७ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने १२ चौकार आणि ४ षटकार मारले.

वेस्ट इंडिजने केलेल्या १९५ धावा

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजने ४ गडी बाद १९५ धावा केल्या. सलामीला आलेल्या शे होपने ३२ धावांचे योगदान दिले. तर रोस्टन चेसने ४० धावा केल्या. दोघांनी पहिल्या विकेटसाठी मिळून ६८ धावा जोडल्या. शिमरन हेटमायरला या सामन्यात चांगली सुरुवात मिळाली होती. पण तो चांगल्या सुरुवातीचं मोठ्या खेळीत रूपांतर करू शकला नाही. तो २७ धावांवर माघारी परतला. रुथरफोर्डने १४ धावा केल्या. शेवटी फलंदाजी करताना रोमन पॉवेलने नाबाद ३४ आणि जेसन होल्डरने नाबाद ३७ धावा केल्या.




भारताला विजय मिळवून दिल्यानंतर विजय साजरा करताना सॅमसंग

## पाकिस्तान विरुद्ध पराभव लागला जिव्हारी, श्रीलंकेच्या हेड कोचने दिला राजीनामा



दिल्ली–श्रीलंकेचा हेड कोच सनथ जयसूर्याने शनिवारी पाकिस्तान विरुद्ध सुपर ८ सामन्यात श्रीलंकेचा पराभव झाल्यावर एक मोठा निर्णय घेतला आहे. संघाला लागोपाठ तीन पराभव मिळाल्यावर हेड कोच सनथ जयसूर्याने राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आयसीसी स्पर्धेत श्रीलंकेच्या निशाजनक कामगिरीनंतर आला आहे. आता जयसूर्याच्या राजीनाम्यानंतर श्रीलंका क्रिकेट बोर्डाने नवा हेड कोच शोधायला सुरुवात केली आहे, अनेक परदेशी कोचेस सोबत याबाबतची बोलणी सुरु आहेत.

कार्यकाळ संपण्यापूर्वीच राजीनामा :

श्रीलंकेचा माजी दिग्गज क्रिकेटर सनथ जयसूर्या हा जुलै २०२४ मध्ये अंतरिम हेड कोच म्हणून संघाशी जोडले गेले होते. तर ऑक्टोबर पासून त्यांनी फुल टाईम कोच म्हणून जबाबदारी स्वीकारली. श्रीलंकेच्या पुरुष संघाचे हेड कोच म्हणून त्यांचा कार्यकाळ हा जून २०२६ पर्यत होता, मात्र संघाच्या ताज्या वर्ल्ड कपमधील खराब प्रदर्शनानंतर जयसूर्याने वेळेच्या आधीच हेड कोच पद सोडण्याचा निर्णय घेतलाय.

झिम्बाब्वे विरुद्ध धक्कादायक पराभव :

ग्रुप स्टेजच्या शेवटच्या सामन्यात झिम्बाब्वेकडून श्रीलंकेचा धक्कादायक पराभव झाला होता. पण ऑस्ट्रेलियावर मोठ्या विजयामुळे श्रीलंकेचा संघ सुपर ८ मध्ये पोहोचला. मात्र सुपर ८ मध्ये श्रीलंकेचा परफॉर्मन्स फ्लॉप ठरला. इंग्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तानकडून मिळालेल्या लागोपाठ पराभवानंतर श्रीलंकेचं वर्ल्ड कप २०२६ मधील आव्हान संपुष्टात आलं. २०१४ नंतर संघ लागोपाठ पाचव्यांदा टी२० वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये पोहोचलेला नाही.

अवघ्या ५ धावांनी सामना गमावला :

यंदाचा टी २० वर्ल्ड कप २०२६ याचं यजमानपद संयुक्तपणे भारत आणि श्रीलंका या दोन संघांकडे होतं. श्रीलंका या स्पर्धेत सेमी फायनलपर्यंत मजल मारण्याच्या खूप जवळ होती, मात्र लागोपाठ तीनही सामन्यात मिळालेल्या पराभवानंतर त्यांच्यावर वर्ल्ड कपमधून बाहेर पडण्याची नामुष्की ओढवली. कर्णधार दासुन शनाकाने पाकिस्तान विरुद्ध पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये ३१ बॉलमध्ये ७६ धावांची कामगिरी केली. त्यांनी २१३ धावांचा पाठलाग केला आणि सामना शेवटच्या ओव्हरमध्ये अत्यंत रोमांचक वळणावर आला होता. मात्र हा सामना अवघ्या ५ धावांनी श्रीलंकेने गमावला.

## इस्रायल–अमेरिका विरुद्ध इराण युद्ध पेटले! इंग्लंड–पाकिस्तान सामना रद्द, हॉटेलमध्येच थांबले संघ



नवी दिल्ली–अबू धाबीमध्ये होणारा पाकिस्तान शाहीन आणि इंग्लंड लॉयन्स यांच्यातील दुसरा अनऑफिशियल वनडे सामना सुरक्षा कारणांमुळे रद्द करण्यात आला आहे. हा सामना १ मार्च २०२६ रोजी अबू धाबीतील ओव्हल स्टेडियमवर खेळवण्यात येणार होता. मात्र मिडल ईस्टमध्ये वाढलेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे तो आयोजित करता आला नाही.

इराण–इस्त्रायल युद्ध

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर इराणकडून झालेल्या प्रत्युत्तरात्मक क्षेपणास्त्र हल्ल्यांचा परिणाम संयुक्त अरब अमिरात सह संपूर्ण मिडल ईस्टमध्ये जाणवू लागला आहे. दुबई आणि अबू धाबीमध्ये स्फोटांच्या घटना घडल्याच्या बातम्या समोर आल्या असून, त्यानंतर हवाई वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

सामना रद्द करण्याचा निर्णय

या पार्श्वभूमीवर इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्ड (एणँ)ने सुरक्षा तज्ज्ञ आणि सरकारी सल्ल्यानुसार सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे एणँने स्पष्ट केले आहे. दोन्ही संघांतील खेळाडू आणि सहाय्यक कर्मचारी यांना हॉटेलमध्येच थांबण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणतेही सराव सत्रही पार पडलेले नाही. परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून, मिडल ईस्टमधील हवाई क्षेत्र पुन्हा खुले झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

पाच सामन्यांची मालिका...

ही पाच सामन्यांची ५० षटकांची मालिका आहे आणि हा दुसरा सामना होता. पहिल्या सामन्यात इंग्लंड लॉयन्सने पाकिस्तान शाहीनचा ९ गडी राखून पराभव केला होता. त्या सामन्यात पाकिस्तान शाहीनने प्रथम फलंदाजी करत १५२ धावा केल्या होत्या, तर इंग्लंडने हे लक्ष्य सहज गाठले होते. यापूर्वी झालेल्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेतही इंग्लंडने ३–० अशी मालिका जिंकली होती. इंग्लंडचा हा दौरा ९ मार्चपर्यंत नियोजित होता, मात्र सध्याच्या परिस्थितीत मालिका रद्द होणार की पुढे ढकलली जाणार, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.या संकटाचा परिणाम इतर नियोजित मालिकांवरही होऊ शकतो. इंग्लंड महिला संघाचे अबू धाबी येथे होणारे प्रशिक्षण शिबिर पुढे ढकलण्यात आले आहे. तसेच ळअएमध्ये १३ मार्चपासून सुरू होणाऱ्या अफगाणिस्तान–श्रीलंका टी–२० आणि वनडे मालिकेवरही अनिश्चिततेचे सावट आहे. दोन्ही क्रिकेट बोर्ड सुरक्षा लक्षात घेऊन अंतिम निर्णय घेण्याची शक्यता

## दक्षिण आफ्रिकेचा विजयी सराव; सिकंदर रझाचे अष्टपैलू योगदान व्यर्थ

दिल्ली–टी२० वर्ल्डकप स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेने अपराजित राहत सेमी फायनलचा टप्पा गाठला. रविवारी दिल्लीतल्या अरुण जेटली आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या लढतीत आफ्रिकेने झिम्बाब्वेवर पाच विकेट्सनी विजय मिळवला. आफ्रिकेने यालढतीआधीच सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता तर झिम्बाब्वेचं स्पर्धेतलं आव्हान आधीच संपुष्टात आलं होतं. त्यामुळे ही लढत सराव स्वरुपाची ठरली.

झिम्बाब्वेने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. भारताविरुद्ध नाबाद ९७ धावांची खेळी करणारा ब्रायन बेनेट या लढतीत विशेष चमक दाखवू शकला नाही. अँनरिक नॉर्कियाने त्याला बाद केलं. झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने ४३ चेंडूत ८ चौकार आणि ४ षटकारांसह ७३ धावांची अर्धशतकी खेळी साकारली. क्काईव्ह मॅडंडेने २० चेंडूत २६ धावा करत त्याला साथ दिली. मात्र बाकीचे फलंदाज मोठी खेळी करू शकले नाहीत. झिम्बाब्वेने १५३ धावांची मजल मारली. आफ्रिकेतर्फे क्वेना मफाका आणि कार्बिन बॉश यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना सिकंदर रझाने एडन मारक्रम आणि क्विंटन डी कॉक या बिनीच्या शिलेदारांना तंबूत परतावलं. यानंतर रायल रिकलटन आणि डेवाल्ड ब्रेव्हिस यांनी पडझड थांबवली. उसळता चेंडू डोक्यावर बसल्याने रिकलटनला कॉंकशन टेस्टला सामोरं जावं लागलं. त्याने फलंदाजी सुरू ठेवली. इव्हान्सचा उसळता



चेंडू मारण्याचा रिकलटनचा प्रयत्न बर्लच्या सुरेख झेलमुळे संपुष्टात आला. त्याने ३१ धावा केल्या. यानंतर ब्रेव्हिसच्या साथीला अनुभवी मिलर आला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली. मझाराबानीचा चेंडू थर्डमॅनच्या दिशेने ढकलायचा प्रयत्न मेयर्सच्या हातात गेला. मिलरने २२ धावा केल्या. सिकंदर रझाने ब्रेव्हिसला बाद करत विजयाची अंधुक आशा निर्माण केली. ब्रेव्हिसने १८ चेंडूत ४२ धावांची खेळी केली. मात्र यानंतर ट्रिस्टन स्टब्ज आणि जॉर्ज लिंड यांनी पाचव्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी करत विजयावर शिक्कामोर्तब केलं. ७३ धावा आणि ३ विकेट्स पटकावणाऱ्या सिकंदर रझाला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.झिम्बाब्वेला दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि भारताविरुद्ध पराभवाला सामोर जावं लागल्याने त्यांचा वर्ल्डकप प्रवास इथेच संपला आहे. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेचा सेमी फायनपर्यंतचा स्वप्नवत असाच आहे. आफ्रिकेने कॅनडा, अफगाणिस्तान (सुपर ओव्हर), न्यूझीलंड, युएई, भारत, वेस्ट इंडिज, झिम्बाब्वे अशा सगळ्यांना नमवत सेमी फायनलमध्ये आगेकूच केली आहे. ४ मार्चला बुधवारी कोलकाताच्या इडन गार्डन्स इथे सेमी फायनल १च्या मुकाबल्यात त्यांच्यासमोर न्यूझीलंडचं

# टी २० विश्वचषक : संजू सॅमसनला पाहताच सूर्यादादाने केलेल्या कृतीने जिंकली मनं



नवी दिल्ली: भारतीय संघाने वेस्ट इंडिजचा पराभव करत सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. भारताच्या या विजयाचा हिरो ठरला संजू सॅमसन. सलामीवीर आणि यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसनच्या ९७ धावांच्या उत्कृष्ट खेळीच्या बळावर टीम इंडियाने हा विजय मिळवला. संजूने या विक्रमी खेळी केली आणि टीम इंडियाच्या विजयाचा मार्ग सोपा केला. संजूच्या या मॅचविनिंग खेळीनंतर सूर्यकुमार यादवने ज्या पद्धतीने त्याचं कौतुक केलं त्याचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.

सलामीला उतरलेल्या संजू सॅमसनने वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात टीम इंडियाला विजय मिळवून देत नाबाद माघारी परतला. त्यानेच डावाची सुरुवात केली आणि विजयी चौकार मारत सामनाही संपवला. संजू सॅमसनने वेस्ट इंडिजविरुद्ध ५० चेंडूत १०४ च्या स्ट्राईक रेटने १२ चौकार आणि चार षटकारांसह नाबाद ९७ धावा केल्या. टी–२० विश्वचषकात धावांचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजाने केलेली ही सर्वोच्च खेळी होती. यापूर्वी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता, ज्याने ८२ धावा केल्या होत्या.

भारताला विजयासाठी शेवटच्या षटकात सात धावांची आवश्यकता होती. संजू सॅमसनने पहिल्याच चेंडूवर एक षटकार आणि मग चौकार मारत विजय निश्चित केला. त्याच्या शानदार कामगिरीसाठी संजू सॅमसनला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. सामना संपल्यानंतर संजू मैदानात बसत त्याने हेल्मेट व बॅट बाजूला टाकली आणि आभाळाकडे पाहत देवाचे आभार मानले.

संजूच्या खेळीचं सूर्याने खास अंदाजात केलं कौतुक संजू या खेळीनंतर वेस्ट इंडिजच्या खेळाडूंना हात मिळवत ड्रेसिंग रूमच्या दिशेने जात होता. तर भारताचे खेळाडू डगआऊटमधून त्याच्या भेटीला येत होता. सर्वात पुढे कर्णधार सूर्यकुमार यादव होता. सूर्याने त्याला पाहताच डोक्यावरची टोपी काढली आणि त्याच्यासमोर झुकून त्याच्या खेळीचं कौतुक केलं. संजू यानंतर सूर्याला घट्ट मिठी मारली. टीम इंडियाच्या ताफ्यातील हा भावुक क्षण सर्वांची मनं जिंकणारा ठरला. यानंतर इशान, तिलक, हार्दिक कोच गौतम गंभीर यांनी संजूला मिठी मारत त्याचं या खेळीसाठी कौतुक केलं.

आता भारताचा सेमीफायनल सामना हा इंग्लंड संघाविरूद्ध होणार आहे. हा सेमीफायनल सामना ५ मार्चला होणार असून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाईल. भारत आणि इंग्लंड यांच्यात सलग तिसऱ्यांदा सेमीफायनल होणार आहे. त्यामुळे या सामन्यात कोण बाजी मारणार यावर सर्वांच्या नजरा असतील.

## जेईई परीक्षेत जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित धावणे याचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** जेईई मेन्स परीक्षेत लातूर जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित गोविंद धावणे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पाडुरंग देडे, प्रेमाताई देडे यांनी सत्कार केला. सुमित धावणे या विध्यार्थ्याने आंतरभारती, राष्ट्र सेवा दलाची संस्कार शिबीरांत सहभाग घेतलेला आहे. अत्यंत अभ्यासू आणि होतकरू विद्यार्थी आहे. यावेळी सुमितची आई सौ साधना धावणे, इतर विद्यार्थी, पालक उपस्थित होते

## दयानंद विज्ञानमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात भाषा विभागाच्या वतीने दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्येष्ठ कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी कॉलेज,परभणी येथील डॉ.एस.एन.केशेट्टी व ग्रामीण कॉलेज वसंतनगर कोटग्याल,जि. नांदेड येथील डॉ.डी.के.केंद्रे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्या व मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देताना मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी भाषिकांचे आद्य कर्तव्य असून मराठी भाषेची अस्मिता जोपासली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, भाषा विभागातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित, हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने, मराठी विभाग प्रमुख डॉ. रामशेट्टी शेटकार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे, कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.विश्वनाथ मोटे, प्रा.कविता जाधव , डॉ. पांडुरंग गोरे, विठ्ठल चव्हाण, विनोद घार, सतीश तांदळे, किशोर जाधव, सुनील राक्षे, बाबासाहेब बचाटे, सागर इंदाणी, पर्णवी ढवारे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास

प्रमुख अतिथी म्हणून दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनीता घोडके - सांगोले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. डॉ. सांगोले यांच्या हस्ते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागतपर मराठी गौरवगीत संगीत शिक्षक स्वप्नाली पुणेकर, कृष्णकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विद्यार्थिनींनी सादर केले. प्रमुख अतिथींचा परिचय इयत्ता आठवीचा विद्यार्थी संकेत संतोष शेरीकर याने करून दिला. मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या हस्ते प्रा. सांगोले यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी कु. तन्वी अमितकुमार वस्त्रद, कु. सायली अंकुश कांबळे यांनी प्राचीन शिलालेखाची माहिती दिली.

यावेळी बोलताना डॉ. सुनिता सांगोले यांनी ''भाषा ही प्रभावी असते. त्यात सातत्याने बदल होत असतात. ते स्वीकारले पाहिजे. पण सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपण प्रत्येकाने भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे,असे सांगितले. कवी कुसुमाग्रज, वि. दा. सावरकर अशा अनेकांचे मराठी भाषेसाठी खूप मोठे योगदान आहे. बोलीभाषा ज्याप्रमाणे आपण वापरतो,त्याप्रमाणे प्रमाण भाषेचाही वापर तेवढाच करणेही गरजेचे आहे. भाषा समृद्ध व्हायला जसे साहित्य साह्यभूत ठरते तसे चित्र, संगीत ठरते. सगळ्यांनीच मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करायलाच हवा असे डॉ. सांगोले मॅडम यांनी आवर्जून सांगितले. मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी आपल्या मनोगतात मराठी दिनाचे महत्व विशद केले. या कार्यक्रमात विद्यालयातील कला शिक्षक संदीप बोते आणि पल्लवी खंदाडे यांनी काढलेल्या ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले कवी कुसुमाग्रज, डॉ. भालचंद्र नेमाडे तसेच कर्नाटक संगीत शास्त्रीय गायिका भारतरत्न एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या रेखाचित्रांचे अनावरण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता आठवीची विद्यार्थीनी कु. वेदिका विलास चिंचोलकर हिने केले. सूत्रसंचालन कु. हर्षिता पोतदार हिने तर आभार प्रदर्शन साईराज वळंके याने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, राहुल पांचाळ, सुनीता जाधव यांच्यासह मराठी विभागाच्या सर्व शिक्षक - शिक्षिकांनी परिश्रम घेतले. या अभिनव उपक्रमाचे संस्थचे अध्यक्ष डॉ सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज यांनी कौतुक केले.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त स्वामी विवेकानंद विद्यालयात ''अटल सायन्स कन्सेप्ट एक्सपो २०२६''; ११७ विज्ञान प्रयोगांचे भव्य सादरीकरण

## मुक्त संधी आणि शैक्षणिक ध्येयधोरणामुळे स्वामी विवेकानंद विद्यालय गुणवत्तेच्या शिखरावर– मा.वसंतराव पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथे आज २८ फेब्रुवारी-राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून अटल लॅबच्या वतीने ''अटल सायन्स कन्सेप्ट एक्सपो-२०२६'' या भव्य सायन्स फेअरचे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते नववीच्या विज्ञान अभ्यासक्रमावर आधारित या उपक्रमात एकूण ११७ विज्ञान संकल्पनांचे प्रयोगात्मक सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.





या सायन्स फेअरमध्ये इयत्ता पाचवी गटातून २९, सहावी ते आठवी गटातून ६० तर नववी गटातून २८ प्रकल्प सादर करण्यात आले. कम्प्युटर, रोबोटिक्स, कोडींग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (), फिजिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, केमिस्ट्री, कृषी, ह्यूमन सायन्स, ॲनिमल सायन्स, ॲग्रीकल्चर, फूड टेक्नॉलॉजी व फूड प्रोडक्शन अशा विविध विषयांवरील नाविन्यपूर्ण व उपयुक्त संकल्पनांचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळाचे माजी राज्य अध्यक्ष मा. श्री. वसंतराव पाटील यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी जुकटा संघटना महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री.शिवराम सूर्यवंशी व प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.एकनाथ पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निकचे उपप्राचार्य श्री.दयानंद हजबे, श्री.अकबर शेख तसेच राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या श्रीमती मनीषा धोत्रे व श्री.सुरज कदम यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी केला. संचलन श्रीमती अलका अंकुशे व रमाकांत शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत यांनी केले. या सायन्स फेअरचे आयोजन उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली अटल लॅब इन्चार्ज ज्योतीराम तवर, विज्ञान शिक्षक भगवंत कलेढले, शेख अफसर, विद्यावर्धिनी गायकवाड, श्वेता भुमकर, रोहिणी सरवदे, सानिया काझी, क्रीडा शिक्षक मुकेश बिरादार, निलांबरी बिरादार, कला शिक्षक पांडुरंग देशमुख, सांस्कृतिक विभागाचे प्रशांत कांबळे, संगादेव अवसकर, स्काऊट गाईड विभागाचे विनोद सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक गणेशराव कदम, बाळाराम पिचारे, बालाजी बोकडे, व्यंकट कांबळे यांच्या समन्वयाने करण्यात आले.

हा विज्ञान मेळावा पाहण्यासाठी विद्यार्थी, पालक तसेच जेएसपीएम कॅम्पसमधील विविध युनिटचे विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी मा.श्री.वसंतराव पाटील यांनी, ''जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्राचार्यांना मुक्तपणे काम करण्याची संधी दिल्यामुळे व त्यांच्या शैक्षणिक ध्येयधोरणामागे खंबीरपणे उभे राहिल्यामुळे स्वामी विवेकानंद विद्यालयाने गुणवत्तेचे नवे शिखर गाठले आहे,'' असे गौरवोद्गार काढले. तसेच संस्थेचे प्रमुख श्री.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या शिस्त, गुणवत्ता व चारित्र्याधिष्ठित विचारांवर चालून शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संस्थेचा व समाजाचा नावलौकिक वाढवला आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

श्री.शिवराम सूर्यवंशी यांनी शाळेतील सृजनशील उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य शाळा प्रभावीपणे करीत असल्याचे नमूद केले. प्राचार्य श्री.एकनाथ पाटील यांनी राज्य अभ्यासक्रमासोबत एनसीईआरटी अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी सिद्ध करणारी शाळा म्हणून स्वामी विवेकानंद विद्यालयाची ओळख निर्माण झाल्याचे सांगितले. सायन्स फेअरमध्ये सहभागी ११७ विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन १२ विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी एकूण १२ पारितोषिके प्रदान करण्यात आली. पारितोषिक वितरण समारंभासाठी स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निकचे प्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत गौड व संस्थेचे समन्वयक श्री.अनिरुद्ध पाटील, प्राचार्य विकास लबडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. ''अटल सायन्स कन्सेप्ट एक्सपो-२०२६'' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जडणघडणीसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरला.

# मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन सोहळा संपन्न!

**लातूर/प्रतिनिधी :**कवी कुसुमाग्रज जयंती अर्थात माय मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालय मराठी विभागाने ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यान व काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या निमित्ताने कवयित्री समिधा कोळगणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. नवोदित विद्यार्थी वर्गातील कवी कवयित्रींनी बहारदार कवितांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची उंची गाठली. मातृभाषा मराठीचा गुणगौरव करणाऱ्या कवितांबरोबरच मानवी भाव आंदोलने टिपणाऱ्या कवितांचेही सादरीकरण झाले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी मराठी भाषा व्यवहार म्हणजे केवळ व्याकरण शुद्ध बोलणे नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट व्यक्तींशी संवाद साधताना भाषेचा प्रभावी वापर करणे होय. जेव्हा आपण भाषा व्यवहारात आणतो, तेव्हा शब्दांच्या अर्थासोबतच संदर्भ, संकेत आणि सामाजिक शिष्टाचार महत्त्वाचे ठरतात. मराठी भाषा व साहित्याचे सामर्थ्य, उपयोग कथन करताना भाषेचा समर्पक वापर अभिव्यक्ती प्रभावी करतो असे मत प्रतिपादन केले. मराठी भाषा, साहित्य व संस्कृती जतन संवर्धन विषयक जाण विकसित करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला अशी भूमिका स्पष्ट केली.

प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री समिधा कोलगणे यांनी मराठी साहित्य, निर्मितीबाबत आपली भूमिका मांडली. कविता त्यांच्या जीवनप्रवासाच्या साक्षी आहेत असे सांगत कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी साहित्य म्हणजे मनाचा आरसा असतो यावर विवेचन केले. कविता सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि कधी काळी आपण केलेल्या रचनांचा आठव त्यांना झाला. मिश्कील शैलीत विद्यार्थ्यांना मातृभाषेच्या गोडव्याची जाणीव करुन दिली. मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. सुभाष कदम, प्रा. राजू मोरे, प्रा. अंगद भुरे,प्रा. विद्या गिराम, डॉ. सुलक्षणा सरवदे, व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमात दयानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. काव्य संमेलनात ओमकार सुरवसे, रवी वाघमारे, योगिता गुम्मे, पायल जावळे, देवांश पाचंगे, मधुरा धानोरकर, यश शिंदे, सुजित कांबळे, अनिकेत बिराजदार, महेश कसबे, प्रियंका कांबळे, पायल माने, अंजली बनसोडे, भाग्यश्री ढोणे, निकिता कांबळे, ऋचा कुलकर्णी, पंकज स्वामी इत्यादी कवी-कवियत्रींनी आपल्या काव्यवाचनाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माय मराठीचा काव्यात्मतेचा प्रत्यय, तिच्यातील मधूर गोडवा अभिरुची संपन्न मनात कायम राहील असा घडला.

## हिंद-दी-चादर' समागमात नऊ समाजांचे सामाजिक ऐक्य

नवी मुंबई,/वृत्तसेवा : हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात नऊ समाजांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. विविध समाज, पंथ आणि घटक एकत्र येत सामाजिक ऐक्याचे प्रभावी दर्शन घडले. या समागमात सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीयम, उदासीन तसेच संत नामदेव महाराजांच्या वारकरी (भगत नामदेव) संप्रदायातील भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. समागमात सर्व समाजातील प्रतिनिधींनी उपस्थित राहून एकता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. श्रद्धा, सेवा आणि समतेच्या विचारांवर आधारित कार्यक्रमात सर्वांनी शांततेत आणि शिस्तीत सहभाग घेतला. कार्यक्रमस्थळी सर्व समाजांनी परंपरा, संस्कृती आणि धार्मिक मूल्यांचा सन्मान राखत शांततेत सहभाग घेतला. विविध समाजांच्या उपस्थितीमुळे हा समागम केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु ग्रंथ साहिब यांच्या शिकवणीनुसार समता व मानवतेचा विचार अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध समाजांच्या सहभागामुळे हा समागम केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता सामाजिक सलोख्याचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरला आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभाग भविष्यासाठी तयार – विद्युतीकरणासाठी 1x25 केव्ही ते 2x25 केव्ही ट्रॅक्शन सिस्टीममध्ये प्रगत ८–चाकी टॉवर वॅगन समाविष्ट केले

**सोलापूर/प्रतिनिधी :** इलेक्ट्रिक ट्रॅक्शन पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि ऑपरेशनल विश्र्वासार्हता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन (टीआरडी) विभागासाठी एक नवीन ८-चाकी टॉवर वॅगन समाविष्ट केले आहे.

नवीनच समाविष्ट केलेले अत्याधुनिक टॉवर वॅगन विशेषतः वाढीव स्थिरता, सुधारित सुरक्षा मानके आणि अधिक कार्यक्षमतेसाठी डिझाइन केलेले आहे. त्याच्या प्रगत वैशिष्ट्यांमुळे देखभाल पथकांना ओएचई कामे अधिक प्रभावीपणे पार पाडता येतील, ज्यामुळे इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सिस्टीममध्ये विश्र्वासार्हतेचे उच्च मानक सुनिश्र्चित होतील.

महत्त्वाचे म्हणजे, टॉवर वॅगन पारंपारिक १÷२५ केव्ही एसी ट्रॅक्शन सिस्टीमपासून प्रगत २÷२५ केव्ही एसी ट्रॅक्शन सिस्टीममध्ये ओएचई नेटवर्कचे अपग्रेडेशन करण्यास मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. भविष्यातील वाहतूक वाढ, वीज मागणी वाढणे आणि सुधारित ऊर्जा कार्यक्षमता पूर्ण करण्यासाठी हे तांत्रिक संक्रमण अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे विभाग पुढील पिढीच्या रेल्वे ऑपरेशन्ससाठी तयार होईल.

या प्रगत ८-चाकी टॉवर वॅगनच्या समावेशासह, सोलापूर विभाग आता एकूण ११ टॉवर वॅगन चालवतो, ज्यामुळे त्याच्या विद्युतीकृत मार्गांवर ओव्हरहेड इक्विपमेंट (OHE) तपासणी, प्रतिबंधात्मक देखभाल आणि पुनर्संचयित उपक्रम करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या मजबूत होते. टॉवर वॅगनची वाढलेली उपलब्धता अधिक वारंवार तपासणी आणि महत्त्वाच्या जक्ए मालमत्तेची वेळेवर प्रतिबंधात्मक देखभाल करण्यास सक्षम करेल यावर भर देण्यात आला आहे. या सक्रिय धोरणामुळे बिघाड कमी होतील, सिस्टमची विश्र्वासार्हता वाढेल आणि रेल्वेचे कामकाज सुरळीत आणि सुरक्षित होईल अशी अपेक्षा आहे.



वेळेवर काम करणे, कार्यक्षमता वाढवणे आणि एकूण सुरक्षा मानके सुधारून या उपक्रमाचा प्रवासी आणि मालवाहतूक सेवा दोघांनाही थेट फायदा होईल. सोलापूरच्या अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ADRM) यांनी विद्युत आणि TRD विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत टॉवर वॅगनचे उद्घाटन केले.

नवीन ८-चाकी टॉवर वॅगनचे कमिशनिंग आधुनिकीकरण, पायाभूत सुविधांचे अपग्रेडेशन आणि प्रगत देखभाल पद्धतींचा अवलंब करण्यासाठी भारतीय रेल्वेच्या सततच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते. सोलापूर विभागाच्या विद्युतीकरण चौकटीला बळकटी देण्यासाठी आणि विश्र्वासार्ह, कार्यक्षम आणि भविष्यासाठी सज्ज रेल्वे सेवा सुनिश्र्चित करण्यासाठी हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शनिवारी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अशविनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांनी रमन इफेक्टचा शोध लावला. या कामगिरीचा गौरव करण्यासाठी आणि वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी, भारत सरकारने १९८६ मध्ये २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून घोषित केला. त्यामुळे आपण विज्ञान दिवस साजरा करतो. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरून भारताला प्रगतीपथावर न्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाला लातूर जिल्ह्यात सुरुवात

**मार्च ते मे २०२६ दरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन**

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा-१)' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मार्च ते मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील महसूल मंडळ स्तरावर तसेच नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर विशेष एकदिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा मुख्य उद्देश एकाच दिवसात नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. शिबिरांमध्ये उपलब्ध होणाऱ्या प्रमुख सेवांमध्ये सातबारा अभिलेखातील चुका दुरुस्त करणे व डिजिटल सातबारा व आठ-अ उतारे तात्काळ पुरवणे, दीर्घकाळ प्रलंबित असलेले फेरफार प्रकरणे निकाली काढणे, उत्पन्न, रहिवासी, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र आदी दाखल्यांचे वाटप, अकृषिक (एनए) जमिनीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची अट रद्द आणि एकवेळचे अधिमूल्य भरण्याची तरतूद याबाबत जनजागृती, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पी.एम. किसान योजना, भूसंपादन प्रकरणातील नोंदी अद्ययावत करणे आदी बाबींचा समावेश आहे.

शिबिरांचे प्राथमिक वेळापत्रक

७ मार्च २०२६ - हरंगुळ बु. (लातूर), किनीथोट (औसा), पोहरेगाव (रेणापूर), औराद शहाजनी (निलंगा), किनगाव (अहमदपूर) इत्यादी

१४ मार्च २०२६ - बाभळगाव (लातूर), बेलकुंड (औसा), कारेपूर (रेणापूर), हलगरा (निलंगा), नळेगाव (चाकूर) इत्यादी

१० एप्रिल २०२६ - गातेगाव (लातूर), भादा (औसा), पानगाव (रेणापूर), शिरुर ताजबंद (अहमदपूर) इत्यादी

१७ एप्रिल २०२६ - कासारखेडा (लातूर), उजनी (औसा), पळशी (रेणापूर), निटूर (निलंगा), आष्टा (चाकूर) इत्यादी

८ मे २०२६ - जिल्ह्यातील प्रमुख नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर शिबिरे (लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, देवणी, शिरुर अनंतपाळ, अहमदपूर, चाकूर, उदगीर, जळकोट)

इतर महसूल मंडळांच्या तारखा स्थानिक तहसीलदार कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे जाहीर केल्या जाणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली असून, अभियान यशस्वी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या महसूल संबंधित तक्रारी, अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह या शिबिरांमध्ये उपस्थित राहावे. या अभियानाचा लाभ घेऊन आपले प्रलंबित प्रश्न सोडवून घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## प्रभात किरणे

त्रिकाल सत्य,आधी
द्यावे मग घ्यावे भूमध्ये
पडलेल्या बिया कडून
शिकावे कणभर देता
मनभर मिळत जाते
हेच तर असे,जीवनाचे
अंतिम सत्य
- इंजि. नागनाथ कलवले, लातूर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



इराण इस्त्राईल युद्धामुळे भारताच्या ५०% तेल पुरवठ्यावर संकट...

## चिमटा



दयाचा

यावर्षी लातुरात पाऊस चांगला झाला तरी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे ! नव्या नगरसेवकांच्या मागे जनता लागली आहे !!

## अहवाल ..

अभ्यासपूर्ण शोधन
समोर येई अहवाल
पुनश्च असंख्य प्रश्न
उठले अनेकसवाल

काहीअसो टिप्पणी
चालू होणार बवाल
घोडे निसटू पळाले
कुठे हरविली नाल

चुकाझाकण्यांसाठी
पांघरा किंमती शाल
हतबध्द होईतलवार
भोवतीकित्येकढाल

बाजार उठलेशंकेचे
विचारांची उलाढाल
शब्द रचे संशयास्पद
रहस्यमय मायाजाल

निष्कर्ष असे काढले
मध्येचं हबकून जाल
चर्चा सत्रे ती सत्राशे
काढत बसालं साल

अपेक्षीत नाही उत्तर
कुणीरागाने हो लाल
नेहमीचेचं मांडा मुद्दे
काळी आहे का दाल

विरोधी बाकांवर मग
आखू लागले ते चाल
पुन्हा अत्युच्चसमिती
हेच चाले सालो साल

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# रोटरी क्लब ऑफ मिड टाउन भव्य चित्रकला स्पर्धेत माऊली च्या विद्यार्थ्यांचे यश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील, स्व.सेठ श्री. कांतीलाल जी कुचेरिया यांच्या स्मरणार्थ घेण्यात येणाऱ्या रोटरी क्लब ऑफ मिड टाउन भव्य चित्रकला स्पर्धेचा निकाल आज दि.२८/०२/२०२६ रोजी जाहीर झाला ,व त्याचे बक्षीस वितरण श्रीकिशन सोमाणी विद्यालयात संपन्न झाले.

या स्पर्धेत लातूर येथील १६५ शाळेमधील, तब्बल २७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या बक्षीस वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सांगलीचे फेमस रिअलॅस्टिक आर्टिस्ट मा.श्री.मंगेश पाटील उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमात व्यक्तिचित्राचे प्रात्यक्षिक करून आपल्या कलेचा ठसा सर्व उपस्थितांच्या मनावर कोरला.व विद्यार्थ्यांना आणि पालकांना, कलाक्षेत्रातील संधी बद्दल उपयुक्त मार्गदर्शन दिले.या कार्यक्रमात श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री. रमाकर स्वामी , रोटरी क्लब चे असिस्टंट डायरेक्टर एडव्होकेट मा.श्री श्रीराम देशपांडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष मा.श्री.अमोलजी दाडगे , प्रोजेक्ट चेयरमन मा.श्री.कपिल जी डुमणे, नूतन अध्यक्ष मा.श्री रमेश जी चिल्ले या सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रत्येक गटातून प्रथम ,द्वितीय ,आणि तृतीय अशी पारितोषिके देण्यात आली.यामध्ये माऊली विद्यार्थी विकास केंद्र लातूर च्या ३ विद्यार्थ्यांनी तब्बल २७०० विद्यार्थ्यांमधून मोठ्या गटातून बक्षीस प्राप्त केले.यामध्ये इयत्ता ९ वी गटातून चि.दीक्षित अवधूत वेदांत, इयत्ता दहावी मधून ,कु.प्रजापती प्रणिता पुष्कर यांनी बक्षीस पटकावले.तर दहावी तील कु. देशपांडे अबोली विश्वास या विद्यार्थीनीने सलग तिसऱ्या वर्षी बक्षीस पटकावून हैट्रिक केली , यानिमित्त संस्था सचिव श्री गंगाधर आरडले ,कोषाध्यक्ष श्री तानाजी बेवनाळे पाटील, प्राचार्या सौ. कविता आरडले , उपप्राचार्या काळे भाग्यश्री यांनी यशस्वी

विद्यार्थ्यांचे विद्यालयात विशेष अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना स्पर्धेत यश प्राप्त करण्यासाठी विद्यालयातील कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी मार्गदर्शन केले.




# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ३ मार्च रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी :** धुलीवंदननिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग मंगळवार, ३ मार्च २०२६ रोजी बंद राहील. तसेच बुधवार, ४ मार्च २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was
: **MS. SHEENA BEE MEV**
TO **SHEENA BEE MUJIB MEVATI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SHEENA BEE MUJIB MEVATI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MS. SHEENA BEE MEV.**
NEW NAME:- **SHEENA BEE MUJIB MEVATI.**
Address :- VISHWKARMA NAGAR, NILANGA. TQ.NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 806101609705
Mob. No.- 9860785240


# स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन गातेगाव यांची संयुक्त मोहीम; गावठी पिस्टलसह तीन संशयित जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने अवैध शस्त्रांविरुद्ध विशेष मोहीम सुरू ठेवली असून त्याच मोहिमेअंतर्गत पहाटेच्या सुमारास करण्यात आलेल्या धडक कारवाईत पोलिसांना महत्त्वाचे यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखा, लातूर व पोलीस स्टेशन गातेगाव यांच्या संयुक्त पथकाने मुरूड-अकोला चौक परिसरात छापा टाकून गावठी पिस्टलसह तीन संशयित इसमांना ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ०४.०० वाजण्याच्या सुमारास पोलीस स्टेशन गातेगाव येथील अधिकारी व कर्मचारी शासकीय वाहनाने हद्दीत नियमित नाईट पेट्रोलिंग करीत असताना माहिती मिळाली की, मुरूड-अकोला चौक परिसरात काही संशयित इसम थांबले असून त्यांच्याकडे अवैध शस्त्र असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाल सुरू केली. सदर माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व गातेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी संयुक्तरीत्या साखरा पाटी परिसरात एकत्र येत पुढील कारवाईचे नियोजन केले.

पोलिसांनी मुरूड-अकोला चौक येथे पहाटे सुमारे ०४.३० वा. सापळा रचून छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच तेथे उभे असलेले तीन इसम गोंधळलेल्या अवस्थेत दिसले. पोलिसांनी पाठलाग करत तत्परतेने त्यांना ताब्यात घेत चौकशी केली.चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे पुढीलप्रमाणे सांगितली

अजय (वय २० वर्षे, रा. फुलेनगर, परळी जि. बीड) २)नयन (वय २६ वर्षे, रा. गंगासागर नगर, परळी वैजनाथ, जि. बीड) ३)सोमेश्वर (वय २० वर्षे, रा. फुलेनगर, परळी जि. बीड) यापैकी अजय गौतम लोमटे याची झडती घेतली असता त्याच्याकडून एक स्टीलची गावठी पिस्टल व मॅगझीन असा ३०,०००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी तत्काळ पंचनामा करून सदर शस्त्र जप्त केले. आरोपीकडे शस्त्राचा कोणताही वैध परवाना नसल्याचे उघड झाले.

त्यामुळे पोलीस स्टेशन गातेगाव येथे शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या शस्त्राचा वापर कोणत्या गुन्ह्यासाठी केला जाणार होता का याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, लातूर व पोलीस स्टेशन गातेगाव यांच्या संयुक्त पथकाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस ठाणे गातेगाव चे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामदास केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक जाधव, तसेच स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे पोलीस अंमलदार संजय कांबळे, रियाज सौदागर, प्रदीप स्वामी, जमीर शेख, प्रशांत स्वामी, विजय पाटील, व्यंकटेश निटूरे, आयुब शेख यांनी केली आहे. सदरच्या पथकाच्या सतर्कता, जलद नियोजन व समन्वयामुळे ही कारवाई यशस्वी ठरली असून त्यामुळे संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांची कारवाई पुढेही अशाच तीव्रतेने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.


तक्ता -४
(नियम ८ पहा )

सायं दैनिक लातूर समाचार,लातूर या वृत्तपत्राची मालकी व अन्ये तपशीलासंबंधीचे निवेदन

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मित्र नगर,लातूर |
| २. प्रसिध्दीचा काळ | : दररोज सायंकाळ |
| ३. मुद्रकाचे नाव | : जडे ऑफसेट प्रिंटर्स,दयानंद शंकर जडे |
| ४. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ५. पत्ता | : जडे ऑफसेट प्रिंटर्स,मित्र नगर,लातूर |
| ६.प्रकाशकाचे नांव | : दयानंद शंकर जडे |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ८. पत्ता | : जडे ऑफसेट प्रिंटर्स,मित्र नगर,लातूर |
| ९.संपादकाचे नांव | : दयानंद शंकर जडे |
| १०.राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ११. पत्ता | : जडे ऑफसेट प्रिंटर्स,मित्र नगर,लातूर |

वृत्तपत्राची मालकी ज्यांच्याकडे आहे, अशा व्यक्ती आणि एकूण भांडवलाच्या एक टक्याहून अधिक हिस्सा धारण करणारे भागीदार किंवा
धारकांची नांवे व पत्ते : विवेकानंद शंकरराव जडे
जडे ऑफसेट प्रिंटर्स,मित्र नगर,लातूर

मी दयानंद शंकर जडे माझ्या माहिती प्रमाणे वरील माहिती खरी असल्याचे जाहिर करतो.

सही
दयानंद शंकर जडे
प्रकाशक -संपादक

दि.२ मार्च २०२६


# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, प्रमुख पाहुण्या संगीत शिक्षिका कांचन तोडकर, पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारत माता व कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.



याप्रसंगी प्रमुख पाहुण्या कांचन तोडकर यांनी कुसुमाग्रजांचा जीवन परिचय सांगितला. कुसुमाग्रजांच्या विशाखा, कौंतेय, दुसरा बाजीराव, नटसम्राट या गाजलेल्या साहित्याची ओळख करून दिली. कुसुमाग्रजांच्या प्रसिद्ध कणा या कवितेचे वाचन त्यांनी केले. तसेच धागा धागा अखंड विणूया या अभंगाचे, वाचलेली-ऐकलेली माणसे गेली कुठे या गझलेचे सुंदर सादरीकरण केले. कुसुमाग्रजांना पद्मभूषण, ज्ञानपीठ तसेच साहित्य अकादमीच्या पुरस्काराने गौरवले गेले हे याप्रसंगी त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी कुटुंबापासून बोलायला सुरुवात होते, आपल्या जन्मापासून शेवटपर्यंत आपल्या सोबत असते ती मराठी भाषा होय. प्रेम, जिव्हाळा, नातं व ऋणानुबंध वाढवणारी भाषा म्हणजे मराठी भाषा होय असे सांगितले. सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, मराठी भाषेतील जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

याप्रसंगी साहित्यिकांच्या माहितीवर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भरवण्यात आलेल्या भित्तिपत्रकाच्या प्रदर्शनीचे मान्यवरांनी अवलोकन केले. मराठी दिनाच्या निमित्ताने मराठीत स्वाक्षरी करण्याचा उपक्रम घेण्यात आला. याप्रसंगी श्रद्धा येळीकर (९ वी अ) श्रिया मादरपल्ले(८ वी क) या विद्यार्थिनींनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत ज्येष्ठ मराठी शिक्षिका क्षमा कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मराठी विषय प्रमुख शैला सांगवीकर यांनी केले तर शेला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानोपासक मंडळाच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख तथा कार्यक्रम प्रमुख तेजस्विनी सांजेकर, मराठी विषय शिक्षक तसेच व्यवस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


## निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

**सितारी विमा सेवा केंद्र**

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६